Library
INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY ★ LIBRARY ★
3/6/03

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक

३ ● युद्ध आणि शास्त्रज्ञ
७ ● चीनमधील ग्रंथव्यवहार
११ ● कोरियातील अमेरिकाविरोध (उत्तर कोरिया)
१६ ● कोरियातील अमेरिकाविरोध (दक्षिण कोरिया)
२० ● मानवतावाद व नवे शतक
२४ ● शांततेच्या पाऊलखुणा

खंड २ : अंक ३ जून २००३

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी ?
## जी सहज चाळता येईल अशी !

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे "अर्थबोधपत्रिका" हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन. ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे. ◆अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठविणे अत्यावश्यक आहे. ◆अंक मिळविण्यासाठी वार्षिक वर्गणी १००रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $२०) डिमांड ड्राफ्ट / मनीऑर्डर / पोस्टल ऑर्डर / चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' या नावे** पाठवावी. त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा. यासंबंधीचा अर्ज अंकात शेवटच्या पानात देण्यात आला आहे.

**अर्थबोधपत्रिका : खंड २ (अंक ३ ) : जून २००३**

**संपादक** - रमेश पानसे, **संपादन सहाय्यक** - राज्यश्री क्षीरसागर

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :** संपादक / व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,
भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : ५६५७१३२ ई-मेल : ispe@vsnl.com
: ५६५७२१० फॅक्स : ५६५७६९७

# संपादकीय

अमेरिकेची घुसखोरी इराक युद्धानंतर थांबणारी नाही; कारण, आता कोरियाकडे 'पाहून घेऊ', अशी अमेरिकेची भूमिका दिसते आहे. जगाच्या आकाशात जोवर युद्धांचे ढग असतील तोवर, अमेरिकन अर्थव्यवस्था प्रकाशात असते, अशी अमेरिकेची कायमचीच भावना आहे. असेही आढळून आले आहे की अमेरिका, आपल्या विरोधाची बीजे आपणच रोवीत असते. दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरिया यांमधील आजपर्यंतचा संघर्ष हे अमेरिकेचेच आजवरचे जगाला देणे आहे. आणि आता तर दोन्ही देशांमध्ये अमेरिकाविरोध धुमसत आहे. या संदर्भातील दोन लेख स्वतंत्रपणे या अंकात देण्यात आले आहेत. या देशांमधील वाढत्या अमेरिकाविरोधाची पार्श्वभूमी कळण्यास या लेखांची मदत होऊ शकेल.

या अंकातील पहिलाच, पत्रव्यवहाररूपी लेख हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे. चाळीस वर्षे शास्त्र-संशोधनाच्या क्षेत्रात कार्यरत राहिलेल्या डॅनियल अमित यांचे मत, आपल्या येथील प्रत्येकालाही, विचार आणि कृती करायला उद्युक्त करेल, असे वाटते. युद्धे व हिंसा ही अविवेकी नि कदाचित अपरिपक्व मनांची लक्षणे आहेत. अनेक समाजधुरीण ही संघर्षमूल्ये जपत असतात आणि पुढच्या पिढ्यांना त्याचाच वारसा देऊन जातात. सामान्य जनता उदासीनपणे यापोटी आलेले भोग भोगत राहते. अशावेळी सामान्यांनी एकत्र येऊन असामान्य कृती केल्याची उदाहरणे, इतिहास आपल्यापुढे ठेवतो. शांतता हे सामाजिक मूल्य सार्वत्रिक करण्यासाठी काही स्वतः पोळलेली माणसेच पुढे येतात; हे आफ्रिकेतील केनिया देशातील छोट्याश्या उदाहरणाने आपल्याला दाखवून दिले आहे.

भारतात आज गोहत्याबंदीचे वारे पुन्हा एकदा वाहू लागले आहेत. यासंदर्भात, विवेक दाखवून देणारा प्रा. वि.म. दांडेकर यांचा एक जुना लेख पुरवणी म्हणून देत आहोत. वाचकांनी तो इतरही अनेकांच्या नजरेस आणावा.

नेहमीप्रमाणेच या अंकातही विविधांगी असे लेख दिले आहेत. परंतु जागेअभावी 'जगाच्या पाठीवर' व 'कालप्रवाहात' ही नेहमीची सदरे या अंकात देता आली नाहीत. 'अर्थबोधपत्रिके'चे वाचक नेहमीच लेखी व तोंडी अंक आवडल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त करतात. त्यांनी आपल्या मित्रमंडळीत आणि नातेवाईक मंडळीत अर्थबोधपत्रिका पोचविण्याचा आवर्जून प्रयत्न करावा. ■■

## वाचकांचा प्रतिसाद

'अर्थबोधपत्रिका' आता मासिक झाल्याने खरोखरच आनंद झाला. हे मासिक विविध अंगानी बहरत जावे ही इच्छा आहे. जागतिक व भारतीय घडामोडींचा आपण जो परामर्श घेता, त्यात याहून वाढ होणे आवश्यक आहे. आजच्या पळत्या जगात कोणतीही गोष्ट तशीच गतिमान असणे, ही आजच्या जगाची गरज आहे. या दृष्टीने विचार करता, आपल्या मासिकात स्वतंत्र लेख सुद्धा प्रसिद्ध करावेत. आपल्या संस्थेच्या नियंत्रणमंडळात अनेक विचारवंत असल्याने, आपल्या मासिकात केवळ संकलित साहित्य असावे हे योग्य आहे काय ?

आपण संकलित साहित्य, भाषांतर आणि योग्य ते संपादकीय संस्कार करून प्रसिद्ध करता. परंतु ते सारे करणाऱ्या व्यक्तीचे नाव का देत नाही ? केवळ संदर्भ देऊन लेख देता हे उचित वाटत नाही. का हे सारे आपण उभयता म्हणजे संपादक व सहाय्यक संपादक या दोन व्यक्ती करतात ?

'महाराष्ट्र टाइम्स' या दैनिकात गेल्या वर्षी 'घरघरणारे उद्योग' ही लेखमाला प्रसिद्ध होत होती. मी ती इंटरनेटवर सातत्याने वाचत असे. महाराष्ट्रातील ठिकठिकाणच्या उद्योगांची सद्य परिस्थितीत काय वाट लागली आहे याचे मर्मभेदक चित्रण या सदरातून केले जात होते. आपण या धर्तीवर विविध उद्योगांवर हल्लीच्या परिस्थितीचा आढावा घेतलात तर ते वाचनीय आणि मार्गदर्शक होणार नाही काय ? उदा. शेती, कापडनिर्मिती, औषधे, प्लॅस्टिक इत्यादी अनेक.

अमेरिका व युरोप येथील उद्योगांच्या तुलनेत चीन, ऑस्ट्रेलिया, भारत या देशातील परिस्थिती आपण जर आमच्या समोर आणलीत तर, ते आत्मपरीक्षणासाठी योग्य होईल.

आपले मासिक सतत वाचनीय आणि उपयुक्त व्हावे, म्हणून या सूचना करीत आहे.

मंगेश नाबर, परळ, मुंबई.

> वेगवेगळ्या प्रकारांतील धर्माची व्याख्या अशी करता येईल की, देव हे सरकारच्या बाजूने आहेत, अशी श्रद्धा जोपासणे म्हणजे धर्म होय ! बर्ट्रांड रसेल

राजकीय

# युद्ध आणि शास्त्रज्ञ

अमेरिकेने हटवादीपणाने इराकवर युद्ध लादले. त्याच्या विरोधात विविध प्रतिसाद जगभर उमटले. या संदर्भातील अलीकडेच घडलेली एक विचारप्रवर्तक घटना वाचकांपुढे मांडत आहोत.

डॉ. डॅनियल अमित हे रोम विद्यापीठातील एक प्राध्यापक. त्यांचा अमेरिकेतील 'फिजिकल रिव्ह्यू'या मासिकाच्या संपादकांशी झालेला ई-पत्रव्यवहार त्यांनी मुक्तपणे प्रसारित केला आहे. तो अल्पसा संपादित करून येथे देण्यात येत आहे.

<u>ई-पत्र १</u>

डॉ. डॅनियल अमित यांस,

'फिजिकल रिव्ह्यू'साठी आलेले एक हस्तलिखित आपणाकडे पाठवीत आहोत. आपण त्याचे परीक्षण करून पाठवावे, ही विनंती. आवश्यक असेल तरच लेखाची लिखित प्रत पाठवू.

मार्टिन ब्लूम
एडिटर-इन-चीफ

<u>ई-पत्र २</u> (२१ मार्च २००३)

एडिटर-इन-चीफ
फिजिकल रिव्ह्यू
यांस,

आत्ता तरी मी कोणत्याही अमेरिकन संस्थेशी (अमेरिकेने इराकवर युद्ध लादल्याने) पत्रव्यवहार करू इच्छित नाही. आमच्यापैकी काही जणांनी १९३९ चे युद्ध सोसले आहे.

डॅनियल अमित
रोम

<u>ई-पत्र ३</u> (८ एप्रिल २००३)

प्रिय डॉ. डॅनियल अमित,

तुमचे ई-पत्र मिळाले. अमेरिकेच्या मध्यपूर्वेतील कारवाईच्या संदर्भात (नाराज होऊन) तुम्ही लेखाचे परीक्षण करू इच्छित नाही, हे समजले. लेखाचे परीक्षण करणे ही

सर्वस्वी स्वेच्छा बाब आहे आणि वैज्ञानिकांच्या समाजासाठी आपण करीत असलेली ती एक सेवा आहे, असे आम्ही मानतो. आजपर्यंत आपण दिलेल्या सेवेसाठी आम्ही आपले आभारी आहोत.

(आजपर्यंत) तुम्ही स्वेच्छेनेच या कामात सहभागी झाला होता, त्यामुळे काम नाकारण्याच्या तुमच्या निर्णयाचा आम्ही अर्थात आदरच करतो. तशी नोंद आम्ही आमच्याकडे केली असून, यापुढे पुन्हा तुम्ही सांगेपर्यंत, तुमच्याकडे परीक्षणासाठी लेख पाठविले जाणार नाहीत.

यासंदर्भात आमचे काय म्हणणे आहे, ते मी मांडतो. मला आशा आहे की, लवकरच तुम्ही, तुमचा आजचा निर्णय बदलून आमच्यासाठी भविष्यात पुन्हा एकदा परीक्षणांचे काम करण्यास सुरूवात कराल.

शास्त्राचा व्यवहार हा आम्ही आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा व्यवहार मानतो आणि त्याच्या वृद्धीसाठी, परस्परांमधील राजकीय मतमतांतरे आम्ही दूर ठेवण्याचा प्रयत्न करतो. एखादा लेख मासिकासाठी स्वीकारताना देखील त्याची केवळ शास्त्रीयताच विचारात घेतली जाते, मग तो लेखक कोणत्या देशाचा आहे याला महत्त्व नसते. आम्ही राजकीयदृष्ट्या एखाद्या देशाच्या विरोधात (अगदी तीव्रतेने) असलो तरी, आमची ही भूमिका आम्ही कायम ठेवली आहे. पुढेही आमची हीच भूमिका कायम राहील.

आम्हाला असेही वाटते की अशा (शास्त्रीय) कामात असणाऱ्या सर्वांनीच आपले सामाजिक आणि राजकीय भेद दूर ठेवून शास्त्रीय संशोधन व प्रकाशनकार्यात सहभागी होण्याचा प्रयत्न करावा. अशा (सामाजिक -राजकीय) प्रश्नांच्या पलीकडे जाऊन शास्त्रीय ज्ञानाचा शोध घेण्यास भिडले पाहिजे.

आपला

मार्टिन ब्लूम

एडिटर-इन-चीफ

<u>ई-पत्र ४</u> (९ एप्रिल २००३)

प्रिय डॉ. ब्लूम

एडिटर-इन-चीफ, अमेरिकन फिजिकल सोसायटी

तुमच्या ८ एप्रिलच्या पत्राबद्दल आभार. तुमच्या पत्रात तुम्ही व्यक्त केलेल्या भावना, तसेच शास्त्रे आणि शास्त्रज्ञांचा समाज यांच्या भूमिकेविषयी आपण प्रकट

केलेला आशावाद यांच्याशी समरस होणे मला आवडले असते. अगदी मनापासून आणि खरं सांगायचं तर, गेली चाळीस वर्षे अशा शास्त्रीय कामांमध्ये सहभागी झाल्यानंतर, तुमच्या आशावादात काही तथ्य आहे असे मला वाटत नाही, आणि त्याची मला खंत आहे.

आज आपण काय पाहत आहोत ? गेल्या पंधरा-वीस वर्षात बोकाळलेल्या अमेरिकन संस्कृतीतल्या जागतिक रानटीपणाने कळस गाठलेला आहे. विज्ञान नि तंत्रज्ञान यांची प्रगती हीच सर्वनाशाची साधने झाली आहेत. (फार पूर्वी) सुधारित तंत्रज्ञानाच्या बळावर, अमेरिकेतील मूळच्या रेड इंडियन लोकांच्या साध्या संस्कृतीवर नि मूल्यांवर जे पाशवी आक्रमण करण्यात आले होते, त्यानंतर आजच पुन्हा इतक्या मोठ्या प्रमाणावर तशाच प्रकारच्या मानवी हत्या आणि बेलगाम मृत्यूचे थैमान, आपण पाहत आहोत. दुसऱ्या वंशाच्या (नागरी किंवा लष्करी) जीवनाबद्दलचा इतका अनुदार उद्गार, स्वतःचेच खरे करण्याचा अट्टाहास आणि निव्वळ मूर्खपणा यांचे जे दर्शन आज आपल्याला होत आहे, त्यावर काहीही उपाययोजना आपल्या हाती राहिलेली नाही.

विज्ञान हे आता तटस्थ असू शकत नाही. विशेषतः एका देशाला निःशस्त्र करण्यासाठी निरीक्षक म्हणवून घेणाऱ्यांकडून लेझरप्रणित क्लस्टर बॉंबचा वापर करून त्या देशातील एक दशांश लोकसंख्येची कत्तल करण्यासाठी जेव्हा विज्ञानाचा वापर केला जातो, तेव्हा ते (विज्ञान) तटस्थ कसे राहू शकेल ? अशा (कृत्यास जबाबदार असणाऱ्या) अमेरिकन पद्धतीच्या विज्ञानाला मी थारा देऊ शकत नाही. मी स्वतः तरी, अमेरिकन वैज्ञानिक समाजाच्या कोणत्याही समाजकार्यात सहभागी होऊ इच्छित नाही. दुर्दैवाने मी देखील अशाच एका, नैतिक अधःपतन झालेल्या संस्कृतीचा (इस्रायल) वारस आहे; आणि तीही आता सुधारणेपलीकडे गेली आहे.

अशा या निराशेच्या परिस्थितीत इतिहासातील अत्यंत दुर्दैवी अशा कालखंडाकडे माझे लक्ष वेधले जाते. अनेक महत्त्वाची राज्ये, आपल्या स्थानापासून ढळून त्यांना अक्षरशः वाळीत टाकण्यात आले आहे किंवा अलग (क्वारंटाईनमध्ये) ठेवण्यात आले आहे. मला वाटते की, आजच्या परिस्थितीत अमेरिकेचीही हीच गत व्हायला हवी.

माझ्या या वृत्तीच्या विस्ताराबाबत किंवा आशेबद्दल माझ्या मनात, अजिबात संभ्रम नाहीत. परंतु, माझी ही कृती व त्याविषयीचे हे निवेदन म्हणजे, मला असह्य झालेल्या परिस्थितीबाबतचा, एक प्रामाणिक हुंकार आहे. या छोट्याशा प्रामाणिक कृतीचा अर्थ एवढाच आहे की, मी माझ्या विद्यार्थ्यांच्या आणि नातवंडांच्या डोळ्यास

डोळा भिडवून पाहू शकेन, मी त्यांना सांगू शकेन की, होय, हे मला नीटपणे माहित झाले होते !

आपला

डॅनियल अमित

ता.क. आपल्यामधील हा पत्रव्यवहार मी मुक्तपणे इतरांना उपलब्ध करू इच्छितो. आपणही असेच करावे आणि त्याला माझी संमती आहे; नव्हे तशी माझी विनंतीही आहे. ■■

*(संदर्भ - इंटरनेट )*

## उत्तर कोरियातील अण्वस्त्रे आणि शास्त्रज्ञांची भूमिका

उत्तर कोरियाने अण्वस्त्रे निर्मितीचा निर्णय घेतल्यानंतर जगात चर्चेचे मोहोळ उठले. त्यातच अमेरिका व उत्तर कोरिया यांच्यातील संबंध तणावाचे झाले. पूर्व आशियातील दक्षिण कोरिया, जपान व चीन हे देशही या चर्चेत सहभागी झाले. दरम्यान उत्तर कोरियातील शास्त्रज्ञ मात्र अडचणीत आले आहेत. अर्थात या अडचणीवर उत्तरही त्यांनी शोधले आहे. झालेय काय की, शास्त्रीय संशोधन आणि त्यावर आधारलेली लष्कराची प्रगती यात, संशोधकांची राजकीय भूमिका व शास्त्राधारित भूमिका यापैकी कशाला महत्त्व देण्यात यावे, हा खरा चर्चेचा मुद्दा आहे. अणुबाँबच्या विकासानंतर शास्त्रज्ञांमध्ये अशीच चर्चा झाली होती. अशा चर्चा नेहमीच फलदायी होतात, असे नाही. पण त्या होत राहणे हेही गरजेचे ठरत असते. उत्तर कोरियातील शास्त्रज्ञांची भूमिका अशी आहे की, शास्त्रज्ञांनी संशोधन करीत राहावे, त्याच्या राजकीय परिणामांचा फारसा विचार करू नये. युद्ध आणि संबंधित बाबी या सरकारच्या अखत्यारीतील असून त्यांचा व शास्त्रीय संशोधनांतील उद्दिष्टांचा मेळ घालण्यात येऊनये. जपानमधील शास्त्रज्ञांचे देखील अशाच प्रकारचे मत आहे. पश्चिमेकडील देशांमधील व भारत, पाकिस्तान येथील बरेचसे शास्त्रज्ञ मात्र, शास्त्रज्ञांनी लष्कराला उपयुक्त ठरणारे संशोधन करावे, अशी भूमिका उघडपणे घेतात. शास्त्रज्ञांनी आपल्या संशोधनाचा संरक्षणक्षेत्रातील उपयोग राजकारण्यांवर सोडून दिला तर ज्याची अपेक्षाही करता येणार नाही अशा गोष्टी घडतील. किंबहुना त्यामुळेच संरक्षण क्षेत्रातील संशोधनात असणाऱ्यांना राजकीय निर्णयातही लक्ष घातले पाहिजे. ■■

*(संदर्भ - नेचर , ८ मे २००३ )*

साहित्य

# पाश्चात्य जगातील चिनी लेखक

'चीनचा ग्रंथव्यवहार खूप अवाढव्य आहे. तेथील प्रकाशक दरसाल सुमारे एक लाख ऐंशी हजार ग्रंथ प्रकाशित करीत असतात. अर्थात त्यातील निम्मी ही क्रमिक पुस्तकेच असतात, ते वेगळे. ती वगळली तरीही वाङ्मयाच्या क्षेत्रात प्रकाशित होणारी पुस्तकांची संख्या खूप मोठी आहे. अमेरिकेतही सरासरीने दरवर्षी साठ हजार नवीन पुस्तके प्रसिद्ध होतात. चीन याबाबतीत आघाडीवर आहे.

चीनच्या ग्रंथव्यवहार क्षेत्रात आता एक नवीनच अध्याय लिहिला जात आहे. 1978 साली आपल्या देशाचे पश्चिमेकडील दरवाजे उघडल्यापासून चीनमधील अनेक बुद्धिमंत व सुशिक्षित, अमेरिका व युरोपमध्ये वास्तव्यासाठी जाऊ लागले आहेत. कुणी शिक्षणासाठी तर कुणी उच्च भौतिक जीवनाच्या इच्छेने; कुणी राजकीय स्थलांतरित म्हणून तर कुणी स्वातंत्र्य उपभोगायला मिळावे म्हणून, असे पश्चिम जगाकडे जात आहेत. यांत लेखकांचा वर्गही मोठा आहे.

चीनमधून बाहेर पडणारा हा चिनी लेखकांचा वर्ग आता परकीय भाषा आत्मसात करून आपली अभिव्यक्ती त्या त्या भाषांतून करू लागला आहे. चीनविषयीच पण इंग्रजी (वा अन्य युरोपीय) भाषेतून आता लिहिले जात आहे. चीनच्या समाज-अर्थ-राजकारणाच्या पार्श्वभूमीवर परंतु इंग्रजीसारख्या भाषांतून लिहिले जाणारे वाङ्मय पाश्चात्य जगालाही आवडू लागले आहे. त्यामुळे चिनी लेखकांची नवी पिढी आता जागतिक वाङ्मयाच्या आकाशात उठून दिसायला लागली आहे. उदाहरणार्थ, दाई सिजी या बाईंनी फ्रेंच भाषेत लिहिलेले 'बलझाक अँड द लिट्‌ल चायनीज सीमस्ट्रेस' हे पुस्तक 'बेस्ट सेलर' म्हणून अलीकडेच गाजले आणि त्याला पाच पारितोषिके प्राप्त झाली. अँकी मीन या लेखिकेच्या, इंग्रजीतून १९९४मध्ये प्रसिद्ध केलेल्या, 'रेड अझेली' या आठवणीवजा पुस्तकाचा, खास पुस्तक म्हणून, न्यूयॉर्क टाइम्सने गौरव केला आहे. असेच आणखी एक आठवणींचे पुस्तक 'रेड स्कार्फ गर्ल' हे पुस्तक बालवाङ्मयाचे अमेरिकेतील अनेक पुरस्कार मिळवून गेले. यालाच १९९८ साली मानाचे 'गोल्ड पेरेन्टस्‌ चॉईस अवॉर्ड' प्राप्त झाले. युंग चँग यांच्या १९९१ साली ब्रिटनमध्ये प्रसिद्ध झालेल्या, 'वाईल्ड स्वान च्या ऐंशी लाखांवर प्रती खपल्या आहेत. तर लुलू वँग यांच्या डच भाषेतील 'द लिली थिएटर' या कादंबरीने हॉलंडच्या ग्रंथक्षेत्रात एक खळबळ उडवून दिली आहे.

पाश्चात्य जगातील चिनी लेखकांच्या या यशाचे खुद्द चीनमध्ये मात्र फारसे पडसाद उमटल्याचे दिसत नाही. हा जीन हे, अमेरिकेत स्थायिक झालेले एक मोठे लेखक; वाङ्मयीन कार्यासाठी त्यांना 'नॅशनल बुक अॅवॉर्ड' प्राप्त झालेले. असेच दुसरे महान लेखक गाओ झिंग झिआन हे फ्रान्समध्ये कायमचे वास्तव्य करून असतात. त्यांना तर वाङ्मयाचे नोबेल

पारितोषिक प्राप्त झाले आहे. परंतु आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजलेल्या या दोन मूळच्या चिनी लेखकांचे फारसे नावही चीनमध्ये ऐकू येत नाही. अशाप्रकारच्या इतर काही लेखकांवर तर चीनमध्ये बंदीच आहे ! एकीकडे चिनी लेखक पाश्चात्य वाङ्मयात स्थान मिळवू लागले आहेत तर दुसरीकडे चीनमध्ये मात्र त्यांची फारशी दखल घेतली जात नाहीये. या विरोधाभासाची कारणे काय आहेत ?

चीनमधून हद्दपार करण्यात आलेले, नोबेल पारितोषिक विजेते गाओ किंवा समीक्षक लिउ झैफ यांनी जग हिंडून जगाचा विविधांगी अनुभव घेतला आहे. त्यामुळे विविध संस्कृतींचा संकर त्यांच्यामध्ये झाला आहे. लिऊ झैफू यांनी म्हटले आहे, 'चीनमधून पलायन केल्यानंतर आयुष्य खडतरच होते. आम्हाला मोठ्या वयात वेगळ्या संस्कृतीशी जूळवून घ्यावे लागत होते.' गाओला तर नोकरीही नव्हती, त्यामुळे त्याला आपली चित्रे विकून पैसे मिळवावे लागत होते. दुसरे एक लेखक, आह चेंग यांनी तर अक्षरश: मोटर दुरूस्तीपासून फास्टफूड घरोघरी पोचविण्याचे काम केले आहे.

एक मात्र झाले आहे; गाओ किंवा लिऊ यांनी जग हिंडून पाहिले, विविध संस्कृतींचे वेगळेपण अनुभवले आणि पश्चिमेतील खडतर जीवनाने त्यांना धर्म, श्रद्धा, संस्कृती, इतिहास वगैरेंबाबत नव्याने विचारप्रवृत्त केले. 'यामुळे आमचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोणच बदलला' असे लिऊ यांनी म्हटले आहे. ' चीनमध्ये आम्ही वेगवेगळ्या राजकीय प्रवाहांमध्ये जीवन-मरणाचा संघर्ष अनुभवला; पण त्यावेळी आम्हाला चीन आणि मानवतावाद यांची खोलवरची समजही होती. त्यांतून उखडले गेलो, पलायन केले यामुळे आमची मने मात्र मुक्त झाली,' असे लिऊ सांगतात. एकीकडे, नव्या जगाशी जुळवून घेतानाच आपल्या स्वत:च्या मातृभूमीत मात्र त्यांचे अस्तित्वच पुसले जात आहे. लिऊ स्वत: १९८०च्या दशकातील चीनमधील मोठे आदरणीय साहित्यिक. पण आता मात्र, गेली दहा वर्षे त्यांच्या वाङ्मयावर चीनमध्ये बंदी आहे; त्यामुळे हळूहळू हा लेखक तेथे विस्मरणात जात आहे. गेल्याच वर्षी त्यांच्या एका पुस्तकाला खुद्द चीनमध्ये प्रकाशक लाभला आहे, पण लोकांच्या मनातील त्यांची पूर्वीची प्रतिमा मात्र आता नाही. लोकांना आता दैनंदिन व्यावहारिक जीवनाची ओढ आहे, ज्या तऱ्हेच्या अमूर्त तात्त्विक प्रश्नांचा शोध घेण्यात लिऊ यांनी काळ घालवला, त्याविषयी चिनी समाजात फारसे आकर्षण आज नाही.

पाश्चात्य जगाकडे वळलेले चिनी लेखक आता आवर्जून इंग्रजीत लिहू लागले आहेत. उदा. 'लॉस्ट डॉटर ऑफ हॅपिनेस ची लेखिका गिलिंग यान ही, चीन सोडण्यापूर्वीच, एक मान्यवर लेखिका म्हणून प्रसिद्ध होती. १९८९ मध्ये ती, तिचा नवरा भाषाशास्त्रज्ञ लॉरेन्स वॉकर याच्यासमवेत अमेरिकेत आली. तिच्या नवऱ्यानेच तिचे पहिले पुस्तक इंग्रजीत भाषांतरित केले आणि ते अमेरिकेत गाजले. तिने इंग्रजीत लिहायचे ठरविले; पण ते तिला कठीण गेले. ('आमचे तारूण्य केवळ माओच्या रेडबुकमधील वचने पाठ करण्यात गेले !'- गिलिंग.) इंग्रजी उशिरा शिकूनही आता ती, दहा वर्षे अमेरिकेत काढल्यानंतर, मात्र, हॉलिवुडसाठी इंग्रजीतून पटकथा लिहू लागली आहे.

ॲंकी मीन या १९८५ मध्ये अमेरिकेत वास्तव्यास आल्या. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे

इंग्रजीत लिहिणे हा त्यांच्या जगण्यासाठीचा आवश्यक भाग ठरला होता. त्यांची चार पुस्तके इंग्रजीत प्रसिद्ध झाली आहेत. (अजून नोंदी मात्र त्या चिनी भाषेतच घेत असतात!). लिझा सी या म्हणतात की, त्या इंग्रजीकडे वळल्या त्या मात्र सर्जनशीलतेसाठी. कोणत्याही निर्बंधांशिवाय त्या इंग्रजीत अभिव्यक्ती करू शकतात म्हणून! अर्थात अमेरिकेत आणि इंग्रजी भाषेत लिहून अँकी मीन यांनी यश मिळविले तरी त्यांच्या मातृभूमीत आणि मातृभाषेत मात्र त्यांचे लेखन प्रकाशकांनी नाकारले आहे. त्यामुळे चिनी ग्रंथबाजारात त्या उतरू इच्छित नाहीत. असाच अनुभव यान या लेखिकेचा आहे. तिचे वाचक जसे पाश्चात्यांमध्ये आहेत तसेच ते चीनमध्येही आहेत. परंतु गेल्या पाच वर्षात मात्र तिने, पाश्चात्य वाचकांवरच लक्ष केंद्रित केले आहे. तिच्या मते, चीनचा बाजार दिवसेंदिवस फारच व्यापारी वृत्तीचा बनत चालला आहे. तिचा अनुभव असा आहे की फारच थोडे चिनी प्रकाशक करार पाळतात; काही तर लेखकाला न कळवताच त्यांचे लेखन छापतात. त्यामुळे लेखनावर बऱ्यापैकी पैसे मिळविणे हे चीनमध्ये फार कठीण आहे. चीनमधील पुस्तकाची आवृत्ती सुमारे वीस हजार प्रतींची असते. सरासरी किंमत दोन डॉलर्स इतकीच असते. अगदी प्रतिथयश लेखकाला आठ टक्के रॉयल्टी मिळून जेमतेम ३२००डॉलर्स मिळू शकतात. अमेरिकेतील 'कलर्स ऑफ द माउंटेन' या कादंबरीसाठी 'दा चेन' यांना मात्र चार लाख डॉलरची प्राप्ती झाली आहे.

चीनच्या ग्रंथबाजारात लेखकाच्या स्वतंत्र विचाराची गळचेपी अजूनही होत आहे. वँग शुओ याने चीनमध्ये लेखनावर बरीच माया मिळविली. तरीही तो कबूल करतो की, 'अनेक बंधने असतात लेखकांवर. उदाहरणार्थ, मी लेखनात माओचा किंवा कम्युनिस्ट पार्टीचा अथवा मुस्लिमांचा उल्लेख करू शकत नाही.' प्रकाशकांबद्दल मात्र त्याला दुहेरी अनुभव आहे. तो म्हणतो, 'प्रकाशक केवळ नफ्याच्या मागे लागलेले आहेत. त्यासाठी ते मला वापरून घेतात; आणि मीही त्यांचा उपयोग करून घेतोय.' ॲनी वँग ही तिच्या तियानमेनवरील 'लिली' या कादंबरीसाठी प्रसिद्ध आहे. १९९८ साली प्रसिद्ध झालेली ही तिची पहिलीच कादंबरी. या कादंबरीला प्रकाशक मिळायलाच तीन वर्षे जावी लागली. पण जेव्हा हा जीन यांची 'वेटिंग' ही कादंबरी 'बेस्ट सेलर' म्हणून गाजली, त्यावेळी ॲनी वँगची कादंबरी त्याच प्रकाशनाने स्वीकारली. तिने आपल्या टाईममधील लेखात म्हटले आहे की, 'चीनचे वाङ्मयीन भवितव्य काय असेल हे सांगणे कठीणच आहे.' जागतिक पटलावर मात्र, चिनी वर्तमान, भूत आणि भविष्य यांविषयीचे लेखन मान्यता पावेल. हे जसे पाश्चिमात्य जगात घडेल, तसेच ते चीनमध्येही होईल. कारण, अँनी वँगसारखे अनेक चिनी लेखक या दोनही जगात वास्तव्य करताहेत. ■■

*(संदर्भ - टाईम, २७ जानेवारी २००३)*

शांततेच्या काळात मुले आपल्या आई-वडिलांचे दफन करतात, युद्ध मात्र या निसर्गनियमास मोडीत काढते आणि आई-वडिलांना आपल्या मुलांचे दफन करायला भाग पाडते. *(ग्रीक इतिहासकार हेरोडॉटस इ.स. पूर्व ४८५ ते ४२५)*

# शास्त्रज्ञ, संशोधन व तंबाखू उत्पादक कंपन्या !!

*विविध विषयांवर संशोधन करणे ही अतिशय खर्चिक बाब असल्याने संशोधनांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी मिळविणे, हे एक मोठे काम होऊन बसते. कधीकधी संशोधनासाठी निधी स्वीकारताना काही बंधने, संबंधित देणगीदाराकडून संशोधकांवर येऊ शकतात. त्यामुळे अनेक संशोधक आपल्या संशोधनाला मिळणाऱ्या निधीबाबत जागरूक असतात. यातून संशोधक व संशोधनसंस्थेतील प्रशासक यांच्यात काही वादही निर्माण होत राहतात. असाच एक वाद सध्या अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठात चालू आहे.*

*तंबाखू उत्पादक कंपन्यांकडून संशोधनासाठी निधी स्वीकारण्यात येऊ नये, असे मत या विद्यापीठातील काही संशोधकांनी व्यक्त केले होते व तसे त्यांनी प्रशासनाला कळविले होते. तंबाखू उत्पादक कंपन्यांकडून निधी स्वीकारला नाही व तसा नियम जर संस्थेने केला तर तंबाखूच्या विरोधातील संस्थांकडून निधी मिळू शकतो, असेही या संशोधकांनी प्रशासनाला सांगितले होते. तंबाखू उत्पादक कंपन्यांच्या संदर्भात का होईना पण असा निर्णय संस्थेने घेतला तर एक प्रथा निर्माण होऊन, उद्या, औषधे तयार करणाऱ्या कंपन्यांच्या संदर्भातही तो लावला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे संशोधनसंस्था असा निर्णय घेऊन निधी मिळविण्याचा मार्ग बंद करू इच्छित नाही. आता संशोधक व त्यांची भूमिका आणि संशोधनसंस्था व तेथील प्रशासकीय अधिकाऱ्यांची भूमिका यांच्यात या विषयावर वाद चालू आहे.*

*संशोधनासाठी मिळणाऱ्या निधींवर अशा प्रकारची बंधने असू नयेत; कारण, यामुळे संशोधनावर मर्यादा येतात असेही काही शास्त्रज्ञांना वाटते. सॅनफ्रान्सिस्को आणि सॅन डिएगो येथील शास्त्रज्ञांनी या विषयावर मतदान केले. तेव्हा तंबाखू उत्पादक कंपन्यांकडून निधी स्वीकारू नये असे बहुतांश शास्त्रज्ञांनी म्हटले. पण शास्त्रज्ञांचा हा ठराव प्रशासनयंत्रणेने मंजूर केला नाही.*

*जगात लाखो लोकांना मृत्यूच्या सापळ्यात अडकविणाऱ्या तंबाखू उत्पादक कंपन्यांकडून संशोधनासाठी निधी स्वीकारणे योग्य ठरतच नाही, असे स्टॅन ग्लॅट्झ या शास्त्रज्ञाने म्हटले आहे. अमेरिकेतील किमान १५ विद्यापीठांमध्ये याबाबतची चर्चा चालू आहे.* ■■

*(संदर्भ - नेचर २७ मार्च २००३)*

राजकीय

# कोरियातील अमेरिकाविरोध

## (भाग १- उत्तर कोरिया)

*(जगाचे पूर्व टोक म्हणून ओळखला जाणारा व भौगोलिकदृष्ट्या छोटासा असलेला कोरिया हा देश आणि पश्चिम टोकावर असलेला, भौगोलिक विस्तार फार मोठा असलेला अमेरिका हा देश, यांच्यातील संबंध आज, अतिशय तणावपूर्ण असे झाले आहेत. कोरियाचे, उत्तर व दक्षिण असे दोन भागात विभाजन झाले असले तरी, या दोन्ही देशांत अमेरिकेच्या विरोधात वातावरण आहे. उत्तर कोरिया अण्वस्त्रे तयार करीत आहे, म्हणून ही तेढ निर्माण झाली आहे. तर दक्षिण कोरियात आर्थिक व राजकीय कारणांमुळे अमेरिकाविरोधी वातावरण आहे. दक्षिण कोरियात अमेरिकेच्या नागरिकांना व्हिसा नाकारण्यात येऊ शकतो, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र, काही मुस्लिम नागरिकांचा / देशांचा, अमेरिकेला जसा विरोध आहे, तसा हा विरोध नाही. कारण, हिंसाचाराची धार या विरोधाला नाही, हा वैचारिक पातळीवरील विरोध आहे. कोणत्याही देशाच्या अमेरिकाविरोधाला अमेरिका-इराक युद्धाच्या पार्श्वभूमीवर व सध्याच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात काही वेगळे महत्त्व आले आहे.*

*दोन्ही देशांमधील अमेरिकाविरोध दोन वेगवेगळ्या लेखात देण्यात आला आहे. भाग १ मध्ये उत्तर कोरियातील विरोध व भाग २ मध्ये दक्षिण कोरियातील अमेरिकाविरोध, मांडण्यात आला आहे. काही अभ्यासकांच्या मते कोरियातील हा अमेरिकाविरोध नजीकच्या भविष्यात मावळण्याची शक्यता नाही, उलट तो वाढण्याची शक्यता मात्र आहे. या देशांसंबंधीचा नकाशा मलपृष्ठाच्या आतील कव्हरवर पाहावा. -संपादक )*

### कोरिया व अमेरिका संबंधांचा इतिहास

कोरिया द्वीपकल्पावर पूर्वी जपानचे वर्चस्व होते. दुसऱ्या महायुद्धानंतर, ऑगस्ट १९४५ मध्ये मित्रराष्ट्रांनी कोरियाला जपानच्या तावडीतून मुक्त केले. तेव्हा रशियाच्या लष्कराने कोरियाच्या उत्तर भागावर कब्जा केला तर अमेरिकेच्या लष्कराने दक्षिण भागावर वर्चस्व मिळविले. कोरियाच्या विभागणीनंतर, रशियाबरोबरच्या संबंधांमुळे उत्तर कोरियात साम्यवादी विचारसरणी रुजली. उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर

आक्रमण केल्याने १९५० ते १९५३ या काळात कोरियात पुन्हा एकदा युद्ध झाले. हे युद्ध कोरियाच्या भूमीवर लढले गेले असले, तरी खरे तर ते चीन व अमेरिका यांच्यात झाले. हे युद्ध दोन्ही बाजूंनी तह होऊन अनिर्णित स्थितीत संपले, तरी तेथे शांततेचे युग मात्र सुरू झाले नाही. यानंतरच्या काळात उत्तर कोरियाने रशियाच्या मदतीने व दक्षिण कोरियाने अमेरिकेच्या मदतीने आपली प्रगती करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, १९६८ मध्ये उत्तर कोरियाने हेरगिरी करणारे अमेरिकेचे एक जहाज पकडले.

यानंतर १९७२ मध्ये दक्षिण व उत्तर कोरियाने शांततापूर्ण मार्गाने एकत्रीकरण करण्याचा निर्णय घेतला, पण केवळ ११ महिन्यांच्या कालावधीतच ही चर्चा खंडित झाली. नोव्हेंबर १९८७ मध्ये दक्षिण कोरियाच्या एका विमानाच्या बॉंबस्फोटाने ठिकऱ्या उडाल्या आणि यात ११५ नागरिक जीवास मुकले. उत्तर कोरियाने हा स्फोट घडवून आणल्याचे मान्य केले.

१९९४ च्या जुलै महिन्यात उत्तर कोरियाचे नेते किम संग यांच्या निधनानंतर किम जोंग यांनी सूत्रे स्वीकारली. दरम्यान शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जगातील इतर राष्ट्रांनी अण्वस्त्रसज्ज होऊ नये यासाठी अमेरिकेचे प्रयत्न चालूच होते. त्यातूनच पूर्वी, सोव्हिएट रशियाच्या सहकार्याने उभ्या राहिलेल्या उत्तर कोरियाच्या अण्वस्त्रविषयक हालचालींकडे अमेरिकेचे बारीक लक्ष होतेच. ऑक्टोबर १९९४ मध्ये उत्तर कोरियाने ऊर्जा मिळविण्यासाठी आपण अण्वस्त्रांचे संशोधन थांबवीत असल्याचे अमेरिकेबरोबर झालेल्या चर्चेत मान्य केले. (पण तत्पूर्वी त्यांनी दक्षिण कोरियाला विनाशाची धमकी दिली होती म्हणे !) कोरिया द्वीपकल्पात उत्तर व दक्षिण कोरिया यांच्यात तसेच जपान व कोरिया यांच्यात शस्त्रास्त्रस्पर्धा वाढणे हे जागतिक सुरक्षेसाठी धोकादायक होतेच.

दक्षिण कोरियाने मात्र उत्तर कोरियाबरोबर शत्रुत्व घेण्यात रस दाखविला नाही. १९९८ मध्ये दक्षिण कोरियाचे अध्यक्ष किम डे जुंग यांनी उत्तर कोरियाबरोबर सौहार्दपूर्ण संबंध राखण्याच्या दृष्टीने सनशाईन धोरणाचा अवलंब केला. (यासंबंधीचा उल्लेख दक्षिण कोरियावरील लेखात आला आहे.)

जपानने आपल्यावर वर्चस्व गाजविल्याबद्दल कोरियाच्या मनात अढी कायम आहे. पण उत्तर कोरियाच्या मनात ही भावना जास्त प्रखर असल्याचे दिसते. कारण, १९९८ च्या ऑगस्ट महिन्यात उत्तर कोरियाने जपानजवळील समुद्रात लांब पल्याची क्षेपणास्त्रे डागली. दरम्यान सनशाईन धोरणांतर्गत दक्षिण कोरिया व उत्तर कोरिया यांच्यात इ.स. २००० मध्ये शिखर परिषद झाली. त्यावेळी दक्षिण कोरियात अमेरिकेचे

सैन्य असताना आणि दक्षिण कोरिया व अमेरिका यांची मैत्री असताना दोन्ही कोरिया अमेरिकेच्या उपस्थितीत एकत्र कसे येऊ शकतील, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यामुळे या तीन देशांमधील संबंधांचे तीन कोन, अमेरिका व उत्तर कोरिया संबंध, अमेरिका व दक्षिण कोरिया संबंध आणि उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया संबंध असे असल्याचे स्पष्ट झाले.

कोरियाच्या एकत्रीकरणाचे अमेरिका स्वागत करेल की अमेरिकेला उत्तर कोरिया हा देश आहे तसाच राहावा असे वाटते ? उत्तर कोरियाकडून दक्षिण कोरियाला कोणत्याही प्रकारची भीती जर नसेल तर, दक्षिण कोरियाने अमेरिकेवर अवलंबून का राहायचे ? बदलत्या आंतरराष्ट्रीय प्रवाहात, उत्तर व दक्षिण कोरियाने पुन्हा एकदा नवे संबंध प्रस्थापित करणे योग्य ठरणार नाही का ? अशा प्रकारचे प्रश्न दोन्ही देशांमधील नेत्यांसमोर आहेत.

या पार्श्वभूमीवर, गेल्या वर्षी म्हणजे ऑक्टोबर २००२ मध्ये, उत्तर कोरियाने आपण १९९४ मधील, अण्वस्त्रे विकसित न करण्याच्या कराराचे उल्लंघन केल्याचे मान्य केले, तेव्हापासून अमेरिका व उत्तर कोरिया यांच्यातील संबंध तणावपूर्ण झाले आहेत. दक्षिण कोरियात अमेरिकेचे सैन्य असल्याने अमेरिका काळजीग्रस्त झाली आहे. पण उत्तर कोरियाने अण्वस्त्रे विकसित केली तरी त्यांचे लक्ष्य दक्षिण कोरिया नसेल, असे दक्षिण कोरियातील जनतेला वाटते. (दक्षिण कोरियातील एका शास्त्रज्ञानेच उत्तर कोरियाला अण्वस्त्रांच्या विकासासाठी मदत केली आहे, अशीही चर्चा दक्षिण कोरियातील नागरिकांमध्ये आहे.) इकडे उत्तर कोरियाच्या नेत्यांनी जानेवारी २००३ मध्ये झालेल्या एका चर्चेत अमेरिकेला टोमणा मारला आहे. 'बाह्य शक्तींमुळे कोरियाच्या एकत्रीकरणाच्या प्रयत्नांमध्ये अडथळे निर्माण होत आहेत, उभय देशांमधील आर्थिक-व्यापारी देवघेव आणि सामाजिक व राजकीय संबंध अडचणीत येत आहेत,' असे उत्तर कोरियाने म्हटले आहे.

## एकविसाव्या शतकातील अण्वस्त्रसज्जता व युद्धाची शक्यता

गेल्या वर्ष-दोन वर्षात अमेरिका व उत्तर कोरिया यांच्यातील संबंध फारच तणावपूर्ण झाले आहेत. इतके की, कोरियाने अण्वस्त्रांची निर्मिती करू नये, आणि अण्वस्त्रे जवळ असल्यास ती नष्ट करावीत, शिवाय अणूभट्टी देखील बंद करावी, यासाठी अमेरिका कोरियावर युद्ध लादेल का, असा प्रश्न अमेरिकेला वेगवेगळ्या पातळ्यांवर विचारला जाऊ लागला आहे. अर्थात, आपण प्रथम युद्ध सुरू करणार

नाही असे अमेरिकेने म्हटले आहे. दुसरीकडे, कोरिया व जपानच्या संबंधांचा इतिहास पाहता, जपानमध्ये अण्वस्त्रनिर्मितीचा विषय चर्चेला आला आहे. उत्तर कोरिया जपानला आपला कट्टर शत्रू मानते, असे मत जपानमधील अण्वस्त्रविषयक तज्ज्ञाने व्यक्त केले आहे.

अण्वस्त्रांचा विनाश अनुभवलेल्या जपानमध्ये, 'अण्वस्त्रसज्ज जपान' ही कल्पना सहजी मान्य होणारी नसली तरी तेथे, वेळप्रसंगी आपल्याकडे अण्वस्त्रे असावीत, असे मत आता व्यक्त करण्यात येऊ लागले आहे. अमेरिकेने जपान किंवा कोरिया यांच्या अण्वस्त्रनिर्मितीबाबत त्या देशांना पूर्णपणे मोकळीक द्यावी असे काही तज्ज्ञांना वाटते. तर त्याबरोबरच काहींच्या मते, अमेरिकेने दक्षिण कोरियातील आपले सैन्य आता माघारी घेणे योग्य ठरणार आहे. अण्वस्त्रांची निर्मिती करण्याआधी जपानला त्यांच्या घटनेत दुरूस्ती करावी लागणार आहे. पण जर का जपानने अण्वस्त्रे तयार करण्याचा निर्णय घेतला तर जपान अतिशय कमी कालावधीत ती तयार करूशकेल. कारण, अणुबाँबच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या प्लुटोनियमचा भरपूर साठा जपानमध्ये असून तेथील शास्त्रज्ञांना अणुबाँबच्या निर्मितीचे तंत्रज्ञान माहिती आहे. कोरिया व जपान जर अण्वस्त्रसज्ज झाले तर चीन व पाकिस्तानही या शस्त्रास्त्रस्पर्धेत उतरतील. चीन व पाकिस्तान या दोन देशांबरोबर युद्धाचा अनुभव घेतलेला भारत अण्वस्त्रसज्ज आहेच. अशा रीतीने एका देशाजवळ अण्वस्त्रे आहेत म्हणून इतर देशही आणखी अण्वस्त्रे तयार करण्याच्या प्रयत्नात राहतील. जगाच्या सुरक्षिततेसाठी ही स्पर्धा अतिशय घातक ठरू शकते. त्यामुळे अनेक विचारवंत व राजकीय तज्ज्ञ काळजीग्रस्त आहेत.

## आर्थिक बाजू

खरे तर, उत्तर कोरिया हा देश आर्थिक अडचणीत आहे. जगातील इतर देशांकडून त्यांना कमीतकमी अटींवर आर्थिक सहाय्य मिळवायचे आहे. म्हणून अण्वस्त्रेनिर्मितीचा बागुलबुवा उभा करून कोरियाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्याचा तेथील राजकीय नेत्यांचा एक प्रयत्न आहे, अशाही चर्चा आहे.

एखाद्या देशाने अण्वस्त्रे तयार करणे ही अमेरिकेसाठी आणखी एका कारणामुळे डोकेदुखी ठरू शकते, ते कारण म्हणजे, असा देशांकडून ती अण्वस्त्रे दहशतवाद्यांच्या हातात पडण्याची भीती अमेरिकेला वाटते. अगदी ओसामा बिन लादेनच्या अल्-कायदापासून इराण, लिबिया किंवा इतर इस्लामिक राष्ट्रांच्या हातात ती पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी अण्वस्त्रांची खरेदी-विक्री जर कोरियाने केली तर तोही एक मोठा धोका आहे. कारण, आर्थिक मदत मागायची आणि आंतरराष्ट्रीय नाणेविधी किंवा जागतिक व्यापार संघटनेच्या जाचक अटी मान्य करायच्या, यापेक्षा उत्तर कोरियासारखी काही राष्ट्रे, अण्वस्त्रांची विक्री करून आपल्या देशाला वाचविण्याचा मार्ग स्वीकारू शकतात. एखाद्या देशाने असा मार्ग स्वीकारला तर इतरही काही देश त्याचे अनुकरण करू शकतात. म्हणजे हा केवळ अण्वस्त्रनिर्मितीचाच प्रश्न ठरत नाही तर त्याची इतरही परिमाणे विचारात घेतली पाहिजेत, असा याचा अर्थ होतो.

अमेरिकेसारख्या बलाढ्या राष्ट्राने इतर देशांना शस्त्रास्त्रे विकून आपल्याकडे बरीच मोठी संपत्ती जमविली. आता हाच प्रकार इतर देशांनी केल्यास तो अमेरिकेला डोईजड होणार आहे.

आता कोरियाला या मार्गापासून कसे परावृत्त करायचे ? हा अमेरिकेपुढील मोठा प्रश्न आहे. यासाठी चीन व रशिया या दोन देशांची मदत घेण्याचा मार्ग अमेरिका स्वीकारण्याची शक्यता दिसते आहे. चीनने देखील अमेरिकेबरोबरची आपली वाद-चर्चा बाजूला ठेवून कोरियाबरोबरच्या चर्चेत रस घेतला आहे. कोरियाने न ऐकल्यास आर्थिक निर्बंध घालून व ऊर्जेसाठी त्या देशाला अडवून ठेवायचे हा एक मार्ग आहे. पण चीनने आर्थिक निर्बंधांना कधीच उचलून धरलेले नाही. दक्षिण कोरिया व जपानदेखील उत्तर कोरियावर आर्थिक निर्बंध घालण्यास उत्सुक नाहीत. उलट या दोन्ही देशांनी उत्तर कोरियाला भरघोस मदतीचा हात पुढे केला आहे. अमेरिकेजवळ आणखी एक मार्ग आहे तो म्हणजे संयुक्त राष्ट्रांच्या मदतीने उत्तर कोरियाची सर्व विमाने व जहाज वाहतूक तपासण्याचा अधिकार, कोणत्या तरी देशांच्या सरकारांना देण्याचा. फ्रान्स व रशिया यासाठी तयार होऊ शकतात. चीनला देखील आर्थिक निर्बंधांपेक्षा हा मार्ग मान्य होऊ शकेल.

जगात अण्वस्त्रांचा प्रश्न असा धोकादायक वळणावर येऊन थांबला आहे. कोरियाला खरोखर अण्वस्त्रेनिर्मितीत रस आहे किंवा कसे हे गूढ तेथील नेत्यांनाच माहिती असावे. पण एका देशाच्या गूढ वागण्याने जग मात्र युद्धाच्या शक्यतेकडे जात आहे, ही खरी काळजी करावी अशी घटना आहे. ■■

*(संदर्भ- कोरिया नाऊ, बिझिनेस वीक, इकॉनॉमिस्ट, इंटरनेट )*

राजकीय

# कोरियातील 'अमेरिकाविरोध' (भाग २- दक्षिण कोरिया)

पृथ्वीच्या दोन टोकांवर असलेल्या कोरिया व अमेरिका या दोन देशांचा राजकीय संबंध १९४५ मध्ये आला. या राजकीय संबंधात कोरियाचे स्थान कायम दुय्यमच राहिले आहे. एवढे की उत्तर कोरियाने देखील अनेक महत्त्वाच्या चर्चांमध्ये अमेरिकेलाच जास्त महत्त्व दिले. दक्षिण कोरियाला अमेरिकेचे वर्चस्व मान्य करण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता, पण त्यांना ते कधी आवडले नाही ही वस्तुस्थिती आहे. मात्र दक्षिण कोरियातील हा अमेरिकाविरोध १९८० नंतर आणि १९९७मधील पूर्व आशियातील आर्थिक संकटानंतर जास्त प्रकर्षाने पुढे आला आहे.

**अमेरिकाविरोध म्हणजे...**

दक्षिण कोरियातील अमेरिकाविरोधाची व्याख्या करणे कठीण आहे, पण तरी काही अभ्यासकांनी हा अमेरिकाविरोध शब्दांत मांडला आहे. 'अमेरिकेविरूद्ध, अमेरिकेच्या सरकारविरूद्ध, तेथील संस्थांविरूद्ध किंवा अमेरिकेची संस्कृती, मूल्ये आणि नागरिक यांच्याविरूद्ध कोणतेही मतप्रदर्शन करणे किंवा तशी विरोधी कृती करणे म्हणजे अमेरिकाविरोध होय,' असे किम या अभ्यासकाने म्हटले आहे.

हा अमेरिकाविरोध कधी इतका टोकाला जातो की, 'अमेरिकन समाजजीवनात ज्या बाबींची पाळेमुळे नाहीत, अशा काही बाबींचीही, केवळ 'अमेरिकन' म्हणून घृणा करायची वा त्याबद्दल तिरस्कार व्यक्त करायचा, म्हणजे अमेरिकाविरोध होय,' असे पॉल होलॅंडर आणि ब्रायन लॅम्ब या अभ्यासकांनी म्हटले आहे. याशिवाय 'अमेरिकेच्या राजकीय व लष्करी हस्तक्षेपाला विरोध म्हणजे अमेरिकाविरोध,' असेही म्हणण्यात येते.

दक्षिण कोरियातील अमेरिकाविरोध भविष्यात वाढण्याचीच शक्यता अधिक आहे. कारण, कोरियातील अमेरिकेला विरोध करणारी तरूण पिढी संख्येने वाढत असून, ती अमेरिकेला पाठिंबा देणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना लवकरच मागे टाकेल, असा अंदाज आहे. मे २००२ मध्ये घेतलेल्या एका सर्वेक्षणानुसार कोरिया व अमेरिका यांच्यातील राजकीय संबंधांना फक्त ५६ टक्के नागरिकांची मान्यता आहे. १९९९ मध्ये हेच प्रमाण ८९ टक्के एवढे होते.

## विरोध का ?

अमेरिकाविरोधातील गटांच्या मते पूर्व आशियातील आर्थिक संकटाच्या वेळी अमेरिकेचे धोरण योग्य नव्हते. तसेच दक्षिण व उत्तर कोरिया यांच्या एकीकरणाच्या प्रयत्नांना अमेरिकेच्या धोरणांमुळे खीळ बसली असून, दक्षिण कोरियाला, उत्तर कोरियाच्या संदर्भातील 'सनशाईन' धोरण देखील नीट राबविता आलेले नाही. दक्षिण कोरियाच्या या अमेरिकाविरोधाला अगदी अलीकडे आणखी एक कारण घडले. ते असे की, अमेरिका व दक्षिण कोरिया यांच्यातील एका कराराप्रमाणे (SOFA - Status of Forces Agreement) अमेरिकेचे, कोरियात सुमारे ३७ हजार सैनिक आहेत आणि त्यांच्या कायदेशीर अधिकारांबाबतच्या या करारामुळे या सैनिकांना कोरियाचे कायदे लागू होत नाहीत. या सैनिकांच्या जीपमुळे झालेल्या अपघातात, १३ वर्षांच्या दोन कोरियन मुली दगावल्या. पण अमेरिकेच्या लष्करी कायद्याने या सैनिकांना कोणतीही शिक्षा दिली नाही. या सैनिकांवर कोरियाच्या न्यायालयात खटला दाखल केला पाहिजे, असे कोरियाच्या नागरिकांना वाटत होते. पण या 'सोफा' कराराप्रमाणे त्यांना हे करता आले नाही. म्हणून 'सोफा' कराराचा फेरविचार व्हावा, अशीही कोरियातील नागरिकांची मागणी आहे.

कोरियाच्या अमेरिकाविरोधाला आर्थिक व सांस्कृतिक कारणेही आहेत. आर्थिक बाबतीतील कारण १९८० च्या दशकात पुढे आले. दक्षिण कोरियाने अमेरिकेबरोबर व्यापार करताना निर्यातीभिमुख धोरणाचा अवलंब करून १९८६ मध्ये व्यापारात प्रथमच आघाडी मिळवली. त्यावेळी, अमेरिका जपानबरोबरच्या व्यापारात पिछाडीवर पडली होतीच. त्यातच कोरियासारखा छोटा देशही द्विपक्षीय व्यापारात, अमेरिकेच्या पुढे गेल्याने अमेरिका त्रस्त झाली. मग कोरियाने अमेरिकेच्या कंपन्यांसाठी आपली बाजारपेठ खुली करावी, अशी मागणी अमेरिकेने पुढे रेटली. शेतीमालापासून ते बौद्धिक संपदा कायद्यापर्यंत सर्व व्यापार खुला व्हावा असे अमेरिकेला वाटत होते. अमेरिकेच्या या धोरणाला कोरियाच्या नेत्यांचा व नागरिकांचा फार मोठा विरोध होता.

त्यातच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने दक्षिण-पूर्व आशियातील आर्थिक संकटाच्या वेळी दक्षिण कोरियाला योग्य मदत केली नाही, म्हणूनही अमेरिकेवर दोषारोपण करण्यात आले. कारण ही संस्था अमेरिकेच्या इशाऱ्यांवर आपली धोरणे आखते, असे मानले जाते. अमेरिका व कोरिया या दोन देशांमध्ये राजकीय संबंध प्रस्थापित झाल्यापासून सांस्कृतिकदृष्ट्या त्यांच्यात एक प्रकारची तफावत राहिली आहे. युरोप

आणि अमेरिका यांच्यातील संबंधात संस्कृतीचा मुद्दा कधी वादग्रस्त ठरला नाही. पण कोरियातील समाजात मात्र अमेरिकेची संस्कृती कधीच पूर्णपणे रुजली नाही. येथील सांस्कृतिक विरोध हा देखील आर्थिक व राजकीय घडामोडींवर जास्त आधारलेला आहे. या अमेरिकाविरोधात राष्ट्रवादाचा मुद्दा नेहमीच पुढे आलेला आहे. हा अमेरिकाविरोध प्रखर असून अनेक घटनांमधून तो प्रकट होत राहतो. उदाहरणार्थ, ऑलिम्पिक स्पर्धेत आईस स्केटिंग या खेळात, काही कारणाने कोरियाच्या एका स्पर्धकाला अयोग्य ठरविण्यात आले होते आणि अमेरिकेच्या स्पर्धकाला त्या खेळाचे सुवर्णपदक देण्यात आले, तेव्हा कोरियातील ६५ टक्के नागरिकांनी हा निर्णय अयोग्य असल्याचे मत व्यक्त केले होते. फुटबॉलच्या स्पर्धांच्या वेळीही अमेरिकाविरोध प्रकर्षाने पुढे आला होता. तेव्हा तर अमेरिकेच्या सैनिकांनी कोरियातून माघार घ्यावी, असा संदेश इंटरनेट व इतर माध्यमातून पसरविण्यात येत होता.

खरे तर कोरियाचे विभाजन झाले असले तरी, दक्षिण कोरियाने उत्तर कोरियाशी सौहार्दपूर्ण संबंध राखण्याच्या दृष्टीने `सनशाईन` धोरण आखले आहे. दक्षिण कोरियाचे अध्यक्ष किम डे जंग यांनी, १९९८ मध्ये आखलेल्या या धोरणात (यानंतर किम डे जंग यांना शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला.) दक्षिण व उत्तर कोरिया यांच्यातील राजकीय, आर्थिक संबंध चांगले राहावेत यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, विभाजनाचा प्रश्न शांततेच्या व चर्चेच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येईल, तसेच कोरिया द्वीपकल्पात शांतता नांदावी व शक्य झाल्यास कोरियाच्या एकत्रीकरणाचा विचारही केला जावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी (जानेवारी २००२) उत्तर कोरियाच्या अण्वस्त्रे तयार करण्याच्या भूमिकेवर कडक टीका करून त्या देशाची तुलना इराकशी केली, तेव्हा अमेरिकाविरोधाला आणखी एक कारण मिळाले. दक्षिण कोरियात त्या विरूद्ध मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाली आणि याचाच एक भाग म्हणजे कोरियातील दुकानदारांनी कोकाकोला व इतर अमेरिकन कंपन्यांच्या उत्पादनांवर बहिष्कार घातला. कोरियातील उत्पादने म्हणजे `स्वदेशी` वापरा, असे तेथे सांगितले जात होते.

सेउल्ल येथील अमेरिकेच्या दूतावासापुढे गेल्या वर्षात अनेकदा निदर्शने झाली. याशिवाय ग्रामीण भागात तसेच अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि जर्मनी येथे वास्तव्यास असणाऱ्या अनेक कोरियन नागरिकांनी देखील या वक्तव्याबद्दल अमेरिकेचा निषेध केला. अमेरिकेचे सैन्य आपल्या देशात आहे याचा अर्थ आपल्याला आपल्या देशाचे

रक्षण करता येत नाही, असा विचार दक्षिण कोरियात बळावत असून आपल्या देशाच्या सार्वभौमत्वावर हा घाला आहे, असेही मानले जात आहे. सेउल्लनजीक योंगसान भागात ६३० एकर जागा अडवून बसलेला अमेरिकेच्या सैनिकांचा तळ दक्षिण कोरियातील नागरिकांना या शल्याची जाणीव करून देत आहे. विसाव्या शतकाच्या सुरूवातीला नेमक्या याच जागेवर जपानी साम्राज्याचे प्रमुख केंद्र होते. त्यामुळे तर हे शल्य आणखी बोचरे झाले आहे. या तळाची जागा बदलण्याचा प्रस्ताव फेटाळला गेला आणि यासाठी दुसरी कोणतीही पर्यायी चांगली जागा नसल्याचे कारण सांगण्यात आले. या लष्करी तळामुळे हॅन नदीचे पाणी प्रदूषित होत असल्यानेही येथील नागरिकांमध्ये या तळाबद्दल नाराजी आहे. पण सोफा करारामुळे दक्षिण कोरियातील संबंधित मंत्र्यांना व अधिकाऱ्यांना अमेरिकेच्या सैन्यासंबंधी कारवाई करता येत नाही, म्हणूनही नागरिकांमध्ये अमेरिकाविरोध तीव्र होत आहे.

येथील अमेरिकाविरोधामागे मूळ कारण सोफा करार हे आहे. म्हणून सोफा कराराचा फेरविचार व त्यात काही सुधारणा २००१ मध्ये करण्यात आल्या. त्याप्रमाणे कार्यालयीन कामकाजाच्या वेळांव्यतिरिक्तच्या काळात जर अमेरिकेच्या सैनिकांनी चूक केली तर त्यांना कोरियातील कायदा लागू होईल, या तळाकडून पर्यावरणाचे रक्षण करण्यात येईल, असे काही बदल करण्यात आले आहेत. पण तरी ते पुरेसे नाहीत असे अमेरिकाविरोधी गटाला वाटते.

उत्तर कोरियाबरोबरचे अमेरिकेचे धोरण व दक्षिण कोरियातील अशा सर्व घटनांमुळे येथील अमेरिकाविरोध वाढलेला असून बुश यांच्या कारकीर्दीत त्यात आणखी भर पडली आहे. अमेरिकेचे एकांगी धोरण व सोफा करार मान्य करण्यापेक्षा दक्षिण कोरियाने आता उत्तर कोरिया, चीन व रशियाबरोबरचे संबंध वाढवावेत, असे मत तेथे व्यक्त करण्यात येत आहे. उत्तर कोरिया बरोबर चांगले संबंध ठेवण्यात किंवा शक्य झाल्यास उभय देशांचे एकत्रीकरण करायचे झाल्यास अमेरिकेला दूरच ठेवणे योग्य ठरेल, असेही तेथे म्हटले जात आहे.

एकंदरीत आतंरराष्ट्रीय राजकारणात नजीकच्या काळात अमेरिका विरुद्ध उत्तर व दक्षिण कोरिया असा वाद रंगण्याची लक्षणे आहेत.

*(संदर्भ- इंटरनेट, कोरिया नाऊ, बिझिनेस वीक, इकॉनॉमिस्ट)*

वैचारिक

# मानवतावाद आणि नवे शतक

जागतिक अशांततेने सुरू झालेल्या या चालू शतकात, 'मानवतावादा'ची संजीवनी ही शांततेसाठी अतिशय उपयुक्त ठरू शकते, असा विश्वास मानवतावादी चळवळ पुढे नेणारे विचारवंत व्यक्त करीत आहेत. कारण मानवतावादाचे बीज हे, मानवाच्या 'मानव' म्हणून असणाऱ्या प्रतिष्ठेभोवती, त्याच्या विचारस्वातंत्र्याभोवती रुजले आणि पुनरूज्जीवनाच्या कालखंडात (१४वे ते १६वे शतक) त्याची जोमाने वाढ झाली. पुनरूज्जीवनाच्या काळाचा केंद्रबिंदू मानवतावाद हा होता. या काळात व्यक्तीची वैचारिक प्रगती, ज्ञानाचा विकास यांचे महत्त्व होते. त्यापूर्वी राजेशाही, धर्मसंस्था आणि सरंजामशाही यांनीच मानवी जीवनाचा, व्यवहाराचा ताबा घेतला होता. मानवाची स्वतंत्र विचारशक्तीच जणू या त्रयींनी हिरावून घेतली होती. पण मानवतावादाला धरून असलेल्या ज्ञानाच्या क्षेत्रातील या पुनरूज्जीवनामुळे जगाचा चेहरा-मोहरा बदलू लागला. याच काळात धार्मिक सुधारणाही (पुनरुत्थानाचा काळ) झाल्या. तेव्हा या दोन्ही चळवळी परस्परांना पूरक ठरल्या होत्या.

त्यानंतर झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य आणि समतेचा संदेश जगाला दिला. मग कृषी क्षेत्रात परिवर्तन घडून आले. त्यानंतर झालेल्या औद्योगिक क्रांतीने आणि सध्या चालू असलेल्या वैज्ञानिक क्रांतीने जगाचा कायापालटच केलेला दिसतो. पुनरूज्जीवनाच्या इतिहासाला, आज सुमारे पाचशे वर्षे लोटूनही एक विशिष्ट महत्त्व प्राप्त झालेले दिसते. कारण, जागतिकीकरणाच्या या युगात 'मानवतावाद' हा विषय पुन्हा एकदा चर्चेचा, व्यवहाराचा केंद्रबिंदू ठरतो आहे.

'एकविसाव्या शतकातील मानवतावाद' या व तत्संबंधी नैतिक मूल्ये इ. विषयांवर, अलीकडे अनेक विचारवंतांनी आपल्या भाषणांत भर दिला आहे. 'अमेरिकन ह्युमॅनिस्ट असोसिएशन'च्या एका कार्यक्रमात, या विषयातील एक विचारवंत बाबू गोजिनेनी यांनी, मानवतावादी कार्यकर्त्यांसमोर व्यक्त केलेल्या विचारांचा हा सारांश.

आज या नव्या शतकाच्या संदर्भात आपण मानवतावादाचा विचार करतो तेव्हा, तर्काधिष्ठित विचारांवर आधारित आणि श्रद्धा व अंधश्रद्धा यांपेक्षा वैश्विक प्रक्रियेत नैसर्गिक असणारी, एक आधुनिक जीवनव्यवहार-पद्धत आपल्याला अपेक्षित

असते. समाजाचा एक घटक म्हणून आणि एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून, मानवी मूल्यांवर आधारित, धर्म-पंथनिरपेक्ष मानवीसमाजाचे अस्तित्व आपल्याला गरजेचे वाटते. आजच्या काळातील स्वातंत्र्य आणि लोकशाही या संकल्पनांचा भक्कम पाया हा या मानवतावादाचा आहे. आपण स्वतःला मानवतावादी म्हणवतो तेव्हा, आपले विचार व कृती यांमध्ये मानवतावादाची मूल्ये असतील, याबद्दल आपण जागरूक असतो, असायला हवे. मानवतावादी व्यक्ती, कोणतीही गोष्ट केवळ देवा-धर्माने म्हटले म्हणून किंवा कुणाच्या विशिष्ट अधिकारापोटी मान्य करीत नाहीत. चौकस, जागरूक व विचारी मनाला मानवतावाद उचलून धरतो; त्याबरोबरच विचार-स्वातंत्र्याबरोबर येणारी जबाबदारी व त्यायोग्य कृती करणे यालाही मानवतावादात फार महत्त्व आहे. म्हणजेच मानवतावादासाठी जबाबदार वैश्विक नागरिकत्व हे अत्यंत आवश्यक आहे.

मानवतावादाला निधर्मी किंवा सेक्युलर समाज व राष्ट्र यांची अपेक्षा असते. यात केवळ प्रशासन किंवा सरकारी व्यवहार यांची धर्म-पंथांपासून फारकत अपेक्षित नसते तर, नागरिकांच्या दैनंदिन समाज-व्यवहारातही धर्म-पंथ डोकावू नये, असे अपेक्षित असते. या धर्म-पंथनिरपेक्षतेमधून मानवतावादाचा प्रवास आपोआप पुढेपुढे जात असतो. या प्रवासात, आपण, म्हणजे मानव कोण आहोत ? आपले विश्व कसे तयार झाले ? जीवन म्हणजे काय ? मग चांगले जीवन कसे असते ? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न कळत-नकळत घडत जातो. या काही प्रश्नांची उत्तरे धर्म-पंथांनीही दिली आहेत. मग मानवतावाद हा अशा काही प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतो म्हणजे हा पण एक धर्म-पंथ आहे का ? मानवतावाद हा आध्यात्मिक, वांशिक आहे का ? किंवा सर्वसामान्यांना न समजणारी, रुचणारी काही अलौकिक विचारधारा आहे का ? अशा प्रश्नांना मानवतावाद्यांना सामोरे जावे लागते. या प्रश्नांच्या अनुषंगाने मानवतावाद आपण समजून घेणार आहोत.

धर्म-पंथांनी विचार केलेल्या काही प्रश्नांचा विचार मानवतावाद पुन्हा करतो हे खरेच आहे. पण म्हणून मानवतावाद हा धर्म-पंथ ठरत नाही. कारण, अशा प्रश्नांची उत्तरे शोधणे हा तत्त्वज्ञानाचा भाग आहे. तत्त्वज्ञान म्हणजे धर्म-पंथ नव्हे. मानवतावादाला या प्रश्नांच्या उत्तरातून सत्याचा शोध घ्यायचा आहे. कोणत्याही धर्माचे स्थान बळकट करायचे नाही किंवा कोणताही धर्म उचलून धरायचा नाही. सत्याचा शोध घेताना सतत वेगवेगळे प्रश्न मनात येणे हेही स्वाभाविक आहे. विश्वाची

रचना आणि मानवाचे त्यातील स्थान, याबाबतचे सत्य शोधणे हे तर मानवतावादासाठी महत्त्वाचे आहेच. पण मानवतावाद त्या सत्याला कवटाळून बसणार नाही. त्या सत्याच्या आधारे एका किंवा काही व्यक्तींचे नव्हे तर, संपूर्ण मानवी समूहाचे जीवन आणखी चांगले व्हावे, यासाठी मानवतावाद प्रयत्न करेल. तसेच विश्वाची रचना फक्त मानवी जीवन वा मूल्ये यांना केंद्रस्थानी ठेवून झाली आहे, असा काही समज मानवतावादात नाही. त्यामुळे मानवतावाद हा मानववंशकेंद्रित नाही.

मानवतावादी असणे म्हणजे सौंदर्याचे, कलेचे कौतुक वा जाण नसणे असा समज काही ठिकाणी पसरलेला आढळतो. मानवतावाद हा तर्काधिष्ठित व विज्ञानाला धरून असणारा आहे. विज्ञान हे ज्ञानाचा शोध घेते. ज्ञान हेच सत्य आहे आणि सत्याचे सौंदर्य हे सौंदर्यातील सत्याइतकेच शाश्वत आहे. विश्वाची कलात्मक रचना, त्यातील सौंदर्य आणि त्यामधील वैज्ञानिक नियम समजून घेऊन, त्या लयीत आपली लय मिसळून जीवन जगणे, हे जीवनातील सौंदर्य समजून घेणे जर मानवतावादाला शक्य होत असेल, तर मानवतावाद हा सौंदर्याला, कलेला महत्त्व देणारा नाही असे कसे म्हणता येईल ?

मानवतावाद हा जीवनातील चांगल्या बाजूंना उचलून धरणारा आहे; तो नकारात्मक नाही, म्हणून त्याने धर्म-पंथांवर टीका करू नये, असे म्हणणारा एक गट आहे. येथे असे लक्षात घेतले पाहिजे की, मानवतावाद हा कोणत्या विशिष्ट धर्म-पंथावर टीका करीत नाही. तर त्यामागील विचारांना, समजुतींना मानवतावादाच्या निकषांवर तपासून पाहात असतो. त्यात असमानता, विषमता आणि तर्कदुष्टता आढळली तर मानवतावाद ते नाकारतो. पण ते विचार कवटाळून बसणाऱ्या नागरिकांचा 'विचाराचा हक्क' मात्र मानवतावाद नाकारत नाही. त्यामुळे मानवतावादाची यासंबंधीची टीका ही धर्म-पंथ यांना उद्देशून नसते.

मानवतावादी देव मानत नाहीत मग ते मानवाधिकार कसे मानतात ? असा प्रश्न कधीकधी उपस्थित केला जातो. याचे उत्तर असे की, देवावर विश्वास ठेवणे अथवा न ठेवणे याचा मानवतावादाशी संबंध येत नाही. मानवाचे 'मानव' म्हणून असणारे अधिकार मान्य करताना, मानवाची 'मानव' म्हणून असणारी प्रतिष्ठा व स्थान हे महत्त्वाचे असते. देवावर विश्वास ठेवत नाही म्हणून, मानवतावाद मानवाधिकार मानतो, असे नाही. आणखी एक प्रश्न विचारला जातो तो म्हणजे, विज्ञान जर अतिशय उपयुक्त आणि आश्चर्यकारक आहे तर मग, विज्ञानाला धरून मानवाने,

निसर्गातील आपल्या सहकाऱ्यांबरोबर शांततेने, सहकार्याने कसे राहायचे ? या प्रश्नाच्या उत्तरात मानवाच्या स्वातंत्र्याच्या मर्यादेचा अर्थ आपल्याला समजून घ्यायला हवा आहे. मानवतावाद हा मानवाला विश्वातील 'मानवा'चे स्थान समजून घेण्यासाठी मदत करतो आणि त्यासाठी विज्ञानाची मदत घेतली जाते. विश्वाच्या रचनेतील प्रत्येक कणाचे असे एक स्थान असते, कार्य असते. त्यात हस्तक्षेप करून मानवाने आपल्या स्वातंत्र्याची मर्यादा ओलांडली की एक असमतोल निर्माण होऊ शकतो. म्हणून मानवाने आपले ज्ञान व वैश्विक रचनेतील आपले मर्यादित स्वातंत्र्य या दोहोंचा मेळ घातला पाहिजे. विज्ञानाने आपल्याला शक्ती दिली, ज्ञान दिले म्हणून त्याचा दुरूपयोग करून विश्वरचनेला बाधा आणण्याचा प्रयत्न धोक्याचा ठरू शकतो.

अखेरीस आपण असे म्हणू शकतो की, मानवतावादाचे सामर्थ्य विश्वाची नैसर्गिक रचना समजून घेण्यात, आवश्यक तिथे विज्ञानाची कास धरण्यात, नैतिकता व स्वातंत्र्य जपण्यात, लोकशाही तत्त्वांना उचलून धरण्यात, मानवामानवामध्ये व मानव-निसर्ग संबंधांमध्ये सहकार्य घडवून आणण्यात आणि निसर्गाचे शाश्वत सौंदर्य कायम राखण्यात आहे.

या सामर्थ्याचा आविष्कार आपल्याला नव्या शतकात आढळतो का ? याचे उत्तर दुर्दैवाने नाही असेच द्यावे लागते. कारण, आजचे जग विषमतेने भरलेले आहे. जगाचा एक पंचमांश भाग असलेले पश्चिमेकडील देश हे बहुतांश क्षेत्रांत आघाडीवर आहेत. जागतिक पातळीवरील एकूण दरडोई उत्पन्नाचा तीन चतुर्थांश भाग हा पश्चिमेकडे वळतो. तरी बौद्धिक संपदा कायदा लागू करून, पूर्वेकडील अनेक प्रकारचे विज्ञान उदाहरणार्थ, औषधी वनस्पती इत्यादींवर ताबा मिळविण्याचा पश्चिमेचा प्रयत्न आहे. जागतिकीकरण ज्या वेगाने होते आहे आणि जागतिक व्यापार संघटना ज्या वेगाने इतर देशांना आपल्यात सामावून घेत आहे ते पाहता ही विषमता आणखी वाढण्याचीच लक्षणे आहेत. दुसरीकडे धार्मिक, वांशिक दंगली आणि संघर्ष हेही मोठ्या प्रमाणावर वाढताहेत. लहान मुले, स्त्रिया आणि गरीब हे सर्वच यांत भरडले जात आहेत. अशा परिस्थितीत मानवतावादाने पुन्हा एकदा जोमाने उभे राहण्याची गरज आहे. मानवतावादाचे सामर्थ्य हे लोकांपर्यंत पोचविण्याची गरज आहे. मानवतावाद हाच जगाला सर्व प्रकारच्या मानवी आपत्तींपासून वाचवू शकतो, असा विश्वास आपण आपल्यामध्ये व इतरांमध्ये निर्माण करण्याची गरज आहे. ■■

*(संदर्भ - इंटरनेट)*



# शांततेच्या पाऊलखुणा

## आफ्रिकेतील स्त्रियांचे प्रयत्न

संघर्ष व हिंसा यांतून आपली प्रगती होत नाही, हे कळूनही माणसे हिंसेचा मार्ग सोडत नाहीत. तरीही प्रत्येक समाजात शांततेच्या मार्गाचा अवलंब करू इच्छिणारे लोक असतातच. आपला मार्गाने इतरांनी यावे यासाठी ते सतत प्रयत्न करीत असतात. अशा ध्येयाने मार्गक्रमणा करणाऱ्यांमध्ये अनेक सामान्य नागरिकांचाही समावेश असतो. आफ्रिकेतील सामान्य स्त्रियांनी शांततेसाठी केलेल्या प्रयत्नांची ही एक छोटी गोष्ट.

आफ्रिकेतील केनिया नावाचा एक छोटा देश. सोमालिया या देशाचा हा शेजारी देश. आफ्रिकेतील असे काही देश हिंसक संघर्ष आणि दुष्काळ तसेच उपासमारी व रोगराई याने ग्रासलेले. पण नैसर्गिक अडचणी असल्या तरी, हळूहळू तेथे राजकीय सुधारणा होऊ लागल्या. जगातील इतर देशांच्या संपर्कात आल्यानंतर तेथील राजकीय परिस्थिती हळूहळू बदलू लागली. विसावे शतक संपण्याच्या काही वर्षे आधी म्हणजे १९९२ मध्ये केनियात लोकशाहीची सुरूवात झाली असे म्हणता येईल; कारण, १९९२ मध्ये तेथे प्रथमच बहुपक्षीय निवडणुका झाल्या. पण त्या फारच हिंसक ठरल्या.

केनियाच्या ईशान्येकडील वाजीर प्रांतात राजकीय कारणांमुळे तेथील स्थानिक जमातीत झालेल्या संघर्षात अनेकांचे बळी गेले. ही एकमेव घटना नाही. तत्पूर्वी अनेक वर्षे येथील स्थानिक जमातींमधील हिंसा व द्वेष चालूच होते. त्यामुळे ते संपविणे गरजेचे झाले होते आणि तेच सर्वांच्या हिताचेही होते. पण शांततेची सुरूवात कोणी करायची ? जेथे हिंसा ही नेहमीचीच झाली होती, तेथे अशी सुरूवात होणेही एक कठीण कर्म होते. अखेरीस तेथील स्त्रियांनी हे काम अंगावर घेतले. सततच्या संघर्षांना कंटाळून गेलेल्या स्त्रियांनी `वुमन फॉर पीस' अशी संघटना स्थापन केली. ओगाडेन, देगोडिया आणि अजुरान या येथील तीनही जमातींमधील हिंसक संघर्ष हा एक न सुटणारा प्रश्न होऊन बसला होता. या संघटनेत वरील तीनही जमातीच्या स्त्रिया एकत्र आल्या होत्या. आपल्याच घराला आग लागल्यावर ती विझविण्यासाठी आम्हालाच प्रयत्न करणे भाग होते असे ही संघटना स्थापन करणाऱ्यांमधील रूकिया हिने म्हटले आहे.

या जमातींमधील पुरूष हिंसेपासून लगेचच परावृत्त होणार नाही, हे या स्त्रियांना माहिती होते. शिवाय जमातीमधील स्त्रियांचा देखील इतर स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलणे भाग होते. म्हणून शांततेच्या या गटाने वेगळेच प्रयत्न केले. हिंसा झाल्यानंतर हिंसाग्रस्त व्यक्ती कोणत्याही जमातीच्या असोत, त्यांना हरप्रकारे मदत करायची, त्यांना खाणे-पिणे, अन्न-धान्य नेऊन द्यायचे. त्यांच्या जखमांवर औषधोपचार करवून घ्यायचे असे काम त्यांनी केले. कोणत्याही एका जमातीची एक स्त्री हे काम उभे करू शकत नाही. एकत्रित प्रयत्नांतून आणि अहिंसेच्या माध्यमातून समोरच्या व्यक्तीचे मत बदलविता येणे शक्य असते, अशी या स्त्रियांची भूमिका आहे. वेळप्रसंगी इतरांना समजाविण्यासाठी हिंसेचा दोषही त्यांनी आपल्या माथी स्वीकारला आहे.

कित्येक वेळा जमातींमधील ज्येष्ठांकडून या संघटनेला, 'आता आम्ही आमच्या मुला-मुलींकडून शिकायचे का ?' असे टोमणेही ऐकावे लागले. तर अनेक पुरूषांनी या कामाची फारशी दखलही घेतली नाही. पण अनुभवान्ती त्यांच्या लक्षात आले की, शांतता हे आपल्या सगळ्यांचेच काम आहे. शासन ते करू शकत नाही. हिंसक घटनानंतर शासन काही रुग्णांवर उपचार करते आणि काही समाजकंटकांना तुरूंगात टाकते, यापेक्षा काहीच जास्त काम शासन करू शकत नाही तेव्हा समाजातील सगळ्यांनीच या कामी पुढाकार घेतला पाहिजे. या विचारांनी प्रेरित होऊन प्रथम टुलो नामक पुरूषाने या स्त्रियांच्या शांततेच्या कामात सहभागी होण्याचे ठरविले. त्यानंतर मग अनेक पुरुषांचा सहभाग यात वाढू लागला.

हिंसेच्या ठिकाणी लवकर पोचून बदला घेण्याच्या वृत्तीने पुन्हा हिंसा घडू नये, यासाठी या गटाने कसोशीने प्रयत्न केले. एका घटनेत एका तरूण मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या विरोधात या गटाने अत्याचार केलेल्या जमातीला चांगलेच धारेवर धरले. त्यांच्याकडून दुसऱ्या जमातीला न्याय मिळेल अशी व्यवस्था केली. तसेच अत्याचारग्रस्त जमातीने या घटनेचा बदला घेऊनये यासाठी त्यांचे मन वळविले. आमच्या संघटनेला अशा अत्याचारांबद्दल खेद वाटतो. पण आमची संघटना कोणाचीही हयगय करणार नाही आणि कोणाच्याही हिंसाचाराला आम्ही थारा देणार नाही अशी त्यांची ठाम भूमिका होती.

संघटनेच्या अथक प्रयत्नांमुळे, जमातींमध्ये ज्येष्ठ व तरूण पुरूषांचे नेतृत्त्व असतानाही, या स्त्रियांच्या संघटनेला मान्यता मिळू लागली. शांततेसाठी व राजकीय सुधारणांसाठी चालू असलेल्या पुरूषांच्या आजच्या चळवळीचे जनकत्व या स्त्रियांच्या

संघटनेकडे जाते. 'वुमन फॉर पीस'च्या ऐवजी आता 'वाजीर पीस ग्रुप' असे त्याचे नामकरण झाले आहे. शांततेसाठी काम करणाऱ्या या संघटनेने शांततेचा एक महोत्सव देखील आयोजित केला होता. दरम्यान, येथील हिंसक संघर्ष घडवून आणण्याची चिथावणी संबंधित जमातीचे पोलीस प्रमुखच देतात, असे या संघटनेच्या लक्षात आले होते. मग त्यांनी युक्ती केली. शांततेच्या या महोत्सवात अशा चिथावणी देणाऱ्या प्रमुखांनाच त्यांनी विशेष निमंत्रित केले आणि शांततेचा संदेश त्यांच्याकडूनच इतरांना दिला. त्यामुळे हे चिथावणी देणारे हळूहळू सुधारले आणि संघर्ष कमी होऊलागले.

शांततेची फळे मधुर असतात हे आता अनेकांना कळून चुकले आहे. त्यामुळे येथील जनता आता शांतता व विकास यांना प्राधान्य देत आहे. काही स्त्रियांच्या प्रयत्नांनी हिंसा व संघर्ष संपू शकतात ते असे.

*(संदर्भ - इंटरनेट)*

## शास्त्रज्ञ आणि संशोधन

*इस्रायल आणि पॅलेस्टाईन यांच्यातील सततच्या हिंसक संघर्षामुळे उभयदेशांतील अनेक शास्त्रज्ञांचे व संशोधकांचे नुकसान झाले आहे; अनेक प्रकल्प रखडले आहेत. पण संशोधकांच्या एका जोडगोळीने मात्र आपल्या अभ्यासावर याचा परिणाम होऊ न देण्याचा निश्चय केला आहे. यासाठी त्यांना इतर संशोधकांनी मदतीचा हात दिला आहे. इस्रायलच्या तेल अव्हिव विद्यापीठातील कारेन अव्राहम या महिला संशोधक, पश्चिम किनारपट्टीच्या भागातील बेथ्लेहेम विद्यापीठातील मोईन कान्नान यांच्या सहकार्याने , पॅलेस्टाईन नागरिकांमध्ये असणाऱ्या बहिरेपणावर संशोधन करीत आहेत. हे बहिरेपण त्यांच्या जनुकीय रचनेतून त्यांना मिळत असून त्याचे प्रमाणही जास्त आहे. आपले संशोधन हे संपूर्णपणे वैज्ञानिक दृष्टिकोणातून व नागरिकांच्या भल्यासाठी आहे, असे या संशोधकांचे म्हणणे आहे. यासंदर्भात इतरही काही आंतरराष्ट्रीय संस्था संशोधन करीत आहेत. पण स्थानिक नागरिकांमध्ये असे संशोधन करणारे हे दोघे पहिलेच आहेत. जनुकशास्त्रज्ञ जॉन सल्सटन, सिडने ब्रेनर आणि रॉबर्ट वॉटरसन या तिघांना मिळून गेल्या वर्षी मिळालेल्या एका मोठ्या वैज्ञानिक पुरस्काराची एक लाख अमेरिकन डॉलर एवढी मोठी रक्कम त्यांना, (कारेन व मोईन यांना) संशोधनासाठी मदत म्हणून उपलब्ध झाली आहे.*

*(संदर्भ - नेचर , २० फेब्रुवारी २००३ )*

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## गोमाता की गोधन - वि.म.दांडेकर

*(भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे संस्थापक प्रा.वि.म. दांडेकर यांनी हा लेख १९६६साली लिहून प्रसिद्ध केला होता. या लेखालाही आता ३७ वर्षे लोटली आहेत. आज गोहत्याबंदीचा विचार पुनरूज्जीवित झाला आहे. त्यामुळे, या लेखालाही पुन्हा प्रकाशित करीत आहोत. -संपादक)*

गोहत्याबंदीसंबंधी सध्या जे आंदोलन चालू आहे त्यामुळे सुदैवाने एका महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नाला तोंड फुटले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून अठरा वर्षे झाली.जवळजवळ एक पिढी लहानाची मोठी झाली. परंतु अजूनही सामान्य माणसाला पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळणे शक्य झालेले नाही. कारण, देशाची आर्थिक प्रगती व्हावी तशी होत नाही. आर्थिक विकासाच्या मार्गात अनेक अडचणी आहेत. त्यात देशाच्या साधनसामग्रीच्या मानाने असणारी फार मोठी आणि फार मोठ्या वेगाने वाढणारी लोकसंख्या ही एक महत्त्वाची अडचण आहे. आता कायद्याने गोहत्याबंदी झाली म्हणजे लोकसंख्येची मोजदाद करताना तिच्यातच गाई-गुरांची गणना करणे आवश्यक होणार आहे. कारण माणसे काय आणि गुरे काय, सारी धरणीला भारभूत आहेत.

या प्रश्नाचे गांभीर्य अनेक जाणत्यांनाही ज्ञात नाही असे दिसते. आज देशात सुमारे ५० कोटी लोकसंख्या तर सुमारे २५ कोटी गाई-गुरांची संख्या आहे.[१] लोकसंख्येचे जमिनीशी प्रमाण दर चौरस मैलास ३७० एवढे आहे. म्हणजे दरडोई दोन एकर जमिनही मिळत नाही. यात सारे भौगोलिक क्षेत्र आले. त्यांतून डोंगर, नद्या, नाले, वाळवंट आणि नापीक क्षेत्र वगळले म्हणजे दरडोई जेमतेम एक एकर जमीन राहते. एवढ्याशा क्षेत्रावर आहे या लोकसंख्येला जगणे अवघड झाले आहे. अशा परिस्थितीत दर दोन माणसांमागे एका गाई-गुरांचा बोजा आपणास कायद्याने पत्करावा लागणार असे दिसते.

हा प्रश्न एवढ्याने संपत नाही. कारण, जमिनीवरील लोकसंख्येचा आणि गाई-गुरांचा हा बोजा गेली काही वर्षे फार झपाट्याने वाढत आहे. याचे कारण, गेल्या दहा-पंधरा वर्षांत उपलब्ध झालेल्या वैद्यकीय, सार्वजनिक आरोग्यविषयक आणि पशु वैद्यकीय

सुखसोयीविषयक योजना पुष्कळ प्रमाणात पूर्ण झाल्या आहेत. त्यांत सार्वजनिक आरोग्यविषयक, वैद्यकीय आणि पशुवैद्यकीय योजना प्रमुख आहेत. त्यामुळे रोगराई कमी झाली आहे. देवी, कॉलरा, प्लेगसारख्या साथीच्या रोगांना आळा बसला आहे. सामान्य आजारांनाही त्वरित उपचार मिळण्याची सोय झाली आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून मृत्यूसंख्येचे प्रमाण झपाट्याने घटत आहे.

वीस-पंचवीस वर्षांपूर्वीचे मृत्यूचे प्रमाण दरहजारी सुमारे ४० पर्यंत असे. आज ते दरहजारी २० किंवा बहुधा त्याहूनही कमी झालेले आहे. याउलट जन्मसंख्येचे प्रमाण जवळजवळ होते तेच कायम आहे.[२] त्यामुळे लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. सध्या ही वाढ दरसाल दर शेकडा सुमारे अडीच टक्के आहे.[३] जी गोष्ट माणसांची तीच गायी-गुरांची. पशुवैद्यकीय सोयींमुळे गायी-गुरांतील साथीच्या रोगांना आळा बसला आहे. सामान्य रोगांना उपचाराची सोय झाली आहे. त्यामुळें मृत्यूसंख्येचे प्रमाण कमी होत आहे. आणि गायी-गुरांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. १९५६ ते १९६० या पाच वर्षांत देशातील गायी-गुरांची संख्या १० टक्क्यांनीं वाढली.[४] याचा अर्थ गायी-गुरांच्या संख्येतही दरसाल दर शेकडा सुमारे दोन टक्क्यांनी वाढ होत आहे. काही राज्यांत वाढीचे प्रमाण याहीपेक्षा जास्त आहे. ओडिसात वाढीचे प्रमाण वार्षिक ४.५ टक्के होते. उत्तर प्रदेशात २.७ टक्के, बिहारमध्ये २.३ टक्के, मद्रासमध्ये २.२ टक्के अशी वाढीची प्रमाणे होती. पशुवैद्यकीय सुखसोयी जशा अधिक प्रमाणात उपलब्ध होतील तसे हे वाढीचे प्रमाणही वाढत जाणार. तसे झाले म्हणजे दहा-वीस वर्षांत काही राज्यांत विशेषकरून उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा या राज्यांत गायी-गुरांची संख्या लोकसंख्येपेक्षाही जास्त झाली तर नवल नाही.

लोकसंख्येत आणि गायी-गुरांच्या संख्येत होणाऱ्या या वाढीचे प्रमाण कमी करण्याकरिता काही तरी करणे अगत्याचे आहे. त्याकरता सार्वजनिक आरोग्यविषयक, वैद्यकीय तसेच पशुवैद्यकीय सुखसोयी कमी करून मृत्यूसंख्या वाढू देणे हा मार्ग अर्थातच उचित होणार नाही. लोकसंख्येबाबत तर हा मार्ग उघडच त्याज्य आहे. प्रत्येक व्यक्तीला दीर्घायुरारोग्य लाभावे, प्रत्येकाने शक्यतर पूर्ण शंभर वर्षे आरोग्यसंपन्न आयुष्य जगावे हे आपल्या आर्थिक विकासाच्या उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे मृत्यूसंख्येत वाढ करून लोकसंख्येस आळा घालणे हे युक्त नाही. किंबहुना आर्थिक विकासाबरोबर मृत्यूसंख्येचे प्रमाण आहे यापेक्षांही कमी होणे अपरिहार्य आहे.

गायी-गुरांच्या संख्येबाबत विचार केला तरी रोगराईने मृत्यूचे प्रमाण वाढवून संख्येस आळा घालणे हे अनेक कारणांनी उचित दिसत नाही. एकतर रोगराईने केवळ निकृष्ट म्हातारी-कोतारी, अनुत्पादक गुरेच मरतात असे नाही. बरी-वाईट सारीच गुरे

मरतात. किंबहुना साथीच्या रोगाचा फैलाव झाला म्हणजे सरसकट सारीच गुरे नष्ट होण्याची भीती निर्माण होते. दुसरे असे की रोगामुळे गुरे मरतातच असे नाही. पुष्कळदा ती नुसती दुबळी आणि बेकार होतात व तशीच जगतात. तात्पर्य, जे लोकसंख्येबाबत तेच गायी-गुरांच्या संख्येबाबत आहे. त्यांच्या वाढीला आळा घालणे तर आवश्यक आहे. परंतु त्याकरिता रोगराई आणि अनियंत्रित मृत्यू हा उपाय अवलंबिता येत नाही. अशा रीतीने रोगराई कमी होऊन व त्यामुळे मृत्यूचे प्रमाण कमी होऊन लोकसंख्या आणि गायी-गुरांची संख्या अनिर्बंध वाढत राहिली तर थोडयाच वर्षात आर्थिक विकास संपुष्टात येईल आणि देश दारिद्रयाच्या गर्तेत अधिकाधिक खोल जाईल हे निर्विवाद आहे. अतएव लोकसंख्या आणि गायी-गुरांची संख्या यांना कोणत्या ना कोणत्या उपायांनी आळा घातलाच पाहिजे हे उघडच आहे. लोकसंख्येबाबत, तिला आळा घालण्याची निकड आपण आता ओळखली आहे. ते करण्याकरीता योग्य तो मार्गही आता सर्वमान्य झाला आहे. मृत्यूचे प्रमाण वाढू द्यावयाचे नाही तर जन्माचे प्रमाण कमी करावयास हवे, म्हणजेच जन्ममृत्यूंचा समतोल राहून लोकसंख्येच्या वाढीस आळा बसेल हे आपणास कळले आहे. पुष्कळ चर्चा आणि विचार-विनिमय करून ही तर्कशुद्ध भूमिका आपण मान्य केली आहे आणि कुटुंब नियोजनाचा देशव्यापी कार्यक्रम आपण हाती घेतला आहे.

गायी-गुरांच्या संख्येबाबतही आपण तर्कशुद्ध भूमिका घेतली पाहिजे, प्रथम आपण हे ओळखले पाहिजे की जशी माणसे तशीच गायी-गुरेही जमिनीला भारभूत आहेत. आपणापाशी मर्यादित जमीन आणि मर्यादित पाणी आहे. त्यावर अमर्याद लोकसंख्या आणि गायी-गुरे आपणांस पोसता येणार नाहीत, त्यामुळे आपण लोकसंख्येबाबत जसे एक धोरण मान्य केले आहे तसेच गायी-गुरांबाबतही त्यांची संख्या मर्यादित ठेवण्याचे धोरण मान्य केले पाहिजे. गायी-गुरांची संख्या मर्यादित ठेवणे हे केवळ आपल्याच हिताचे आहे असे नाही, तर ते गायी-गुरांच्याही हिताचे आहे. आपण बाजूला होऊन सारा देश गायी-गुरांच्या हवाली केला किंवा देशाचा सारा कारभार केवळ गायी-गुरांचे हित डोळ्यासमोर ठेवूनच करावयाचा ठरविले, तरीही गायी-गुरांच्या संख्येस आळा घालणे आवश्यक ठरेल. तसे न केले तर गायी-गुरे उपासमारीने आणि रोगराईने मरतील. हा प्रश्न नीट समजावून घ्यावयाचा असेल तर हा मुद्दा मूलभूत आहे ते मान्य केले पाहिजे. गायीला आई मानून गोहत्येला बंदी घालावी अशी मागणी करणारेही हा मूलभूत मुद्दा मान्य करतील, अशी आशा आहे. ज्यांना हा मूलभूत मुद्दाच मान्य नसेल त्यांच्याशी या विषयावर अधिक चर्चा करणे अशक्य आहे. तरीसुद्धा याविषयी त्यांची भूमिका नीट समजावून घ्यावी या उद्देशाने पुढील प्रश्न विचारतो -

(१) लोकसंख्येस आळा घालावा परंतु गायी-गुरांची संख्या मात्र अनिर्बंध वाढू द्यावी

अशी त्यांची इच्छा आहे काय ? तसे झाले तर लोकसंख्येपेक्षा गायी-गुरांची संख्या जास्त होण्यास फार काळ लागणार नाही हे त्यांनी लक्षात घ्यावे.

(२) लोकसंख्या आणि गायी-गुरांची संख्या दोन्हीही अनिर्बंध वाढू द्याव्यात अशी त्यांची इच्छा आहे काय ? तसे असेल तर त्याचे अंतिम परिणाम काय होतील याचा त्यांनी विचार करावा. लोकसंख्या आणि गायी-गुरांची संख्या यांच्या वाढत्या भारामुळे आर्थिक विकास लवकरच संपुष्टात येईल आणि देश दारिद्र्याच्या गर्तेत अधिकाधिक खोल जाईल. माणसाला गुरांपेक्षा फारसे वेगळे जीवन जगता येणार नाही. अशा परिस्थितीत दोन पर्याय संभवतात. एकतर मानव आणि गायी-गुरे वाढत्या दारिद्र्यात परंतु गुण्यागोविंदाने राहतील. मग उपासमार आणि रोगराई वाढून मृत्यूचे साम्राज्य पसरेल. नाहीतर उपासमारीची झळ लागली म्हणजे मानव आणि गायी-गुरे यांत संघर्ष सुरू होईल. त्यावेळीही गोहत्याबंदीचा कायदा जारी राहिला तर गायी-गुरांचे राज्य चालू होईल.

या प्रश्नांची उत्तरे सुसंगत आणि जाहीरपणे मिळाली तर परस्परांच्या भूमिका कळणे सोपे होणार आहे. यापुढील विवेचन, ज्यांना, लोकसंख्येप्रमाणेच गायी-गुरांची संख्याही मर्यादित करणे आवश्यक आहे, हा मुद्दा मान्य आहे, अशांकरिताच आहे.

लोकसंख्येचे नियंत्रण करण्याची आजची सर्वमान्य पद्धती म्हणज संततीनियमन. याच पद्धतीने गायी-गुरांची संख्याही मर्यादित करावी, अशी काहींची सूचना आहे. अलीकडेच केन्द्रीय गोसंवर्धन मडळाने गायींना लूप बसवावे अशी सूचना केल्याचे समजते. एकदा गायीला आपली किंवा आपल्या मुलांची माता मानले म्हणजे या साऱ्या सूचना ओघानेच येतात. आता या सूचनांनुसार खरोखरीच सर्व गायींना लूप बसविले तर त्याचा परिणाम काय होईल याचा विचार करू. एकदा गायींना लूप बसविले म्हणजे अर्थातच त्यांची गर्भधारणा आणि वीण थांबेल. अशा रीतीने गायी-गुरांच्या संख्येस आवश्यक तो आळा बसेल. परंतु गाय व्याली नाही तर ती साहजिकच दूध देणार नाही. मग प्रश्न उपस्थित होतो की अशा भाकड गायीला कोण पोसणार ? अर्थात एकदा गायीला आपण आपल्या अगर आपल्या मुलांच्या आईप्रमाणे वागविण्याचे ठरविले म्हणजे ती व्याली नाही, तिने दूध दिले नाही तरी आपण तिला पोसले पाहिजे. आपल्या आईला किंवा आपल्या मुलांच्या आईला लूप बसविला तरी आपण त्यांना सांभाळतोच ना ! मग लूप बसविला म्हणून गायीस का पोसू नये ? अवश्य पोसले पाहिजे. परंतु दुर्दैवाने भाकड गायीस खाऊ घालण्यास आपण तयार नसतो. आपण गायीस माता म्हणतो परंतु ते गाय दूध देते म्हणून. गायीने दूध देणे बंद केले आणि तिने पुन्हा दूध देणे संभवनीय नसले तर आपण तिला चारा-पाण्याची टाळाटाळ करतो. ही कठोर वस्तुस्थिती आहे की आपण गायीस आई म्हटले तरी खाऊ घालण्याचा प्रश्न आला म्हणजे आपण गाय आणि माय यांत फरक करतो. यात लाज वाटण्यासारखे

काही नाही. कारण गायीच्या आपणासंबंधीच्या भावनाही अशाच मर्यादित स्वरूपाच्या असाव्यात असे दिसते. आपण गायीला आई म्हणतो. आपणापैकी काही अगदी तिच्या पुत्राप्रमाणे वागतातही. तरीसुद्धा आपली वासरे आणि माणसे यांत गाय फरक करतेच. गायीशी आपला जो संबंध आहे त्यासंबंधी कोणी काहीही काव्य केले तरी वस्तुस्थिती अशी आहे की तिला वासरू असल्याखेरीज गाय दूध देण्याचे नाकारते आणि ती दूध देणार नसेल तर आपण गायीस चारा देण्याचे नाकारतो. गायीला एकदा लूप बसविला की आपण तिला पोसणार नाही हे सिद्ध करण्यास भरपूर पुरावा आहे. लूप न बसविताच भाकड झालेल्या अशा असंख्य गायी आज देशात आहेत. त्यांना आपण कसे वागवितो हे पाहिले तरी पुरे. या असंख्य गायी आज त्यांना कोणीही पोटभर चारा घालण्यास तयार नसल्याने मोकाट हिंडत आहेत. ग्रामीण भागात अशा गायी उपाशीपोटी वणवण फिरतात आणि थोड्याच दिवसात वन्य बनतात. मग त्यांनी कोणाच्याही पिकात शिरावे. त्यांना धरणेही अशक्य होते. अनेक जिल्ह्यांत अशारीतीने वन्य झालेल्या गायी पिकास उपद्रव देत आहेत. शेवटी मोकाट हिंडूनही पोट भरणे अशक्य झाले म्हणजे या गायी उपासमारीने खंगून झिजतात आणि अखेरीस धुळीत मिळतात. तात्पर्य, आज रोगराईने नव्हे तर उपासमारीने गायी मृत्यूमुखी पडत आहेत.

देशांतील गायी-गुरांच्या संख्येतील गायीच्या आणि बैल यांच्या संख्येची तुलना केली म्हणजे वरील विधानाची सत्यता पटेल. बहुतेक सर्व प्रांतातून बैलांच्या संख्येच्या मानाने गायींची संख्या कमी आहे. उत्तर प्रदेशाचेच उदाहरण घेऊ. या प्रांतात गोभक्तीचा उमाळा सर्वात अधिक असल्याने येथे गायीची जोपासना सर्वांत उत्तम होत असेल असे मानण्यास हरकत नाही. याच प्रांतातील १९६१ च्या पशुधन खानेसुमारीतील आकडे काय सांगतात ते पहा. या खानेसुमारीनुसार या प्रांतात गायी-बैलांचे प्रमाण दर १०० गायींमागे १९५ बैल असे आहे. म्हणजे गायींची संख्या बैलांच्या संख्येच्या मानाने जवळजवळ निम्मी आहे. हे कसे घडले ? गायीला होणाऱ्या वासरांत खोंड आणि कालवडींची संख्या जवळजवळ सारखीच असते. तेव्हा दोघांची सारखीच जोपासना केली तर गायी-बैलांची संख्याही जवळजवळ सारखीच असायला हवी. मग प्रत्यक्षात गायींची संख्या इतकी कमी कशी ? या प्रांतात पारंपरिक गोभक्ती प्रखर आहेच. शिवाय १९५४ सालापासून गोहत्येस संपूर्ण बंदी कायद्याने केलेली आहे. मग या प्रांतात गायींचे काय होते ? त्या अर्धपोटी वणवण हिंडतात आणि शेवटी उपाशी पोटाने धुळीस मिळतात. इतर अनेक राज्यांत कमीअधिक प्रमाणात हीच परिस्थिती आहे. बिहारमध्ये गायीबैलांचे प्रमाण १०० गायीस १६३ बैल असे आहे. गोवध न करताही बैलांच्या मानाने गायींची संख्या एवढी कमी कशी होते ? अर्थात गायींची उपासमार होते, हे एकच उत्तर आहे.

बैलांच्या मानाने गायींची संख्या कमी नाही अशी काही अपवादात्मक राज्ये आहेत. ती म्हणजे केरळ, काश्मीर आणि राजस्थान. केरळमध्ये ख्रिश्चन धर्मीयांचे वर्चस्व आहे. काश्मीरमध्ये मुसलमानांची बहुसंख्या आहे. राजस्थान हा एकच खरा अपवाद आहे. या प्रांतात सुदैवाने अजून मुबलक जमीन आहे. सुबत्ता आहे. परंतु लोकसंख्या आणि गायी-गुरांची संख्या वाढू दिली तर येथेही उत्तर प्रदेश, बिहार, गुजरातची परिस्थिती निर्माण होण्यास फार काळ लागणार नाही. हे काही अपवाद सोडले तर बाकी सर्व प्रांतात, बहुतेक सर्व जिल्ह्यांत बैलांच्या मानाने गायींची संख्या कमीअधिक प्रमाणात, कमी आहे. गायींची उपासमार हेच त्याला एक कारण आहे. गायींला लूप बसविल्यानंतर त्या भाकड झाल्या म्हणजे त्यांची काय हालत होईल हे समजण्यास अधिक पुरावा नको.

म्हाताऱ्या आणि भाकड गायींना सांभाळण्याकरता खास गोसदने काढावीत अशी एक सूचना आहे. गायींना लूप बसविले आणि गोवध बंदी केली म्हणजे अशी गोसदने उघडणे क्रमप्राप्तच आहे. आज आपल्या वृद्ध माता-पित्यांकरताही असे वृद्धाश्रम आपण काढू शकत नाही. तत्पूर्वीच वृद्ध आणि म्हाताऱ्या गायींच्या करिता गोसदने काढावी लागणार असे दिसते. किंबहुना केंद्रीय गोसंवर्धन मंडळातर्फे अशी काही गोसदने निघालेलीही आहेत. त्यांच्याबाबत सर्वसामान्य अनुभव असा की की या गोसदनांतील हांकेला गोभक्तांकडून आर्थिक प्रतिसाद मिळत नाही आणि सरकारी तिजोरीतून त्यांना मिळणाऱ्या पैशाचा विनियोग निव्वळ गोरक्षणाकरताच होतो असे नाही. हे निव्वळ अनुषंगाने म्हटले. मुख्य मुद्दा असा की, गोरक्षणासाठी खर्च होणारा पैसा खाजगी असो वा सार्वजनिक असो, भाकड, निरूपयोगी गायींना घरात ठेवून पोसले जात असो, त्यांना मोकाट सोडून देण्यात आलेले असो वा गोसदनात पाठविलेले असो, देशाच्या मर्यादित साधनसंपत्तीवर त्यांचा भार पडेलच म्हणून त्यांची अनिर्बंध वाढ थांबविणे अपरिहार्य ठरते.

हा केवळ म्हाताऱ्या, निरूपयोगी भाकड गायी-गुरांचाच प्रश्न नाही. देशात अमर्याद वाढलेली म्हातारी गायी-गुरे हा एक गंभीर प्रश्न आहेच. पण खरा प्रश्न तेथे संपत नाही. तो अधिक मूलगामी आहे. देशाच्या आर्थिक गरजेनुसार आपणांस अमुक तितक्या गायी-बैलांची गरज आहे असे आपण क्षणभर मानू. त्यानुसार त्या संख्येपेक्षा अधिक असलेली म्हातारी, निरूपयोगी गायी-गुरे ही काही तरी उपायाने आपण कमी केली असेही क्षणभर मानू. त्यानंतर गायी-गुरांची आहे ही संख्या कायम ठेवावयाची वाढू द्यावयाची नाही असे आपण ठरविले तर नेमकी इतकीच वासरे जन्मास येऊन मोठी झाली पाहिजेत की नैसर्गिकरीत्या मृत्यू पावलेल्या गायी-बैलांची ती जागा घेतील. आता अडचण अशी की यापेक्षा फार अधिक वासरे जन्मास येतात. आता गायी-गुरांची संख्या कायम ठेवावयाची

तर गायीला तीन-चार पेक्षा अधिक वासरे होऊ देता कामा नयेत. त्याकरिता संततीनियमन करावे तर त्यामुळे भाकड गायींचे प्रमाण वाढते म्हणून ते शक्य नाही. तेव्हा दोनच मार्ग राहतात. या सर्व वासरांनी मोठे व्हावयाचे तर कर्तव्यक्षमता कमी होताच वरील गायी-बैलांनी त्यांना जागा मोकळी करून दिली पाहिजे. नाहीतर जन्मास आलेल्या वासरांतील काही निवडक वासरांनाच मोठे होण्याची संधी दिली पाहिजे. आजही जन्मास येतात त्या साऱ्या वासरांना आपण वाढू देत नाहीच. ही सारी वासरे मोठी झाली असती तरी गायी-गुरांच्या संख्येचा हा प्रश्न केव्हाच हाताबाहेर गेला असता. आज जन्मास येणाऱ्या वासरांपैकी केवळ चवथा हिस्सा वासरेच मोठी होतात. खानेसुमारीतील एक वर्षाखालील वासरांची संख्या आणि तीन वर्षांवरील गायी-बैलांची संख्या यांची तुलना केल्यास ही गोष्ट स्पष्ट होईल. थोडीशी आकडेमोड केली तर असे दिसून येते की, वासरांत मृत्यूचे प्रमाण एवढे मोठे आहे की जेमतेम ३० टक्के वासरेच मोठी म्हणजे तीन वर्षांची होतात. हे प्रमाणही निरनिराळ्या राज्यांत निरनिराळे आहे. उत्तर प्रदेशात जन्माला आलेल्या वासरांपैकी केवळ २० टक्के वासरेच तीन वर्षांची होतात. पंजाबमध्येही हीच परिस्थिती आहे. केवळ गुजरात, मध्यप्रदेश आणि हिमाचल प्रदेश या राज्यांत ४० ते ५० टक्के वासरे तीन वर्षांची मोठी होतात. बाकी सर्व राज्यांत हे प्रमाण ३० टक्क्यांहून कमीच आहे.

हे कसे घडते ? आपण गोमांस भक्षण करीत नाही, मग ही इतकी वासरे लहानपणीच का मरतात ? याचे कारण असे की वासरू जन्मास येताच आपण त्याला त्याच्या मातेपासून दूर करतो आणि गोमाता गोमाता म्हणत आपण गायीच्या जवळ जातो. पेंढा भरलेले खोटे वासरू दाखवून आपण गायीची वंचना करतो आणि तिचे दूध चोरून नेतो. तिकडे बिचारे वासरू भूकेने उपाशी मरते. आपल्या वासराच्या नशिबी काय वाढून ठेवलेले आहे याची पुसटशी कल्पना जरी बिचाऱ्या गायीस असती तरी असे वाटते की आपले वासरू आमच्या हाती सोपविण्याऐवजी ती स्वतःच स्वेच्छेने कसाईखान्यात जाऊन दाखल झाली असती.

गोमातेसंबंधी आपल्या प्रेमाचे हे वास्तविक स्वरूप आहे. आपण गायीस माता म्हटले तरी खरोखरी आर्थिकदृष्ट्या एक उपयुक्त प्राणी म्हणूनच तिच्याकडे पाहतो. जोपर्यंत तिच्याकडून दूध मिळण्याची आशा असते तोपर्यंतच आणि ज्यामानाने ती दूध देईल त्या मानानेच आपण तिला चारा घालण्यास तयार असतो. ती दूध देईनाशी झाली म्हणजे आपण तिला पोटभर चारा देत नाही. पण ठारही मारत नाही. तिने यथाकाळ उपासमारीने झिजून मरावे. दुसरे असे की, ती व्यायली की तिचे वासरू बाजूस सारून, तिची वंचना करून आपण तिचे दूध चोरतो. मात्र आपण वासराला ठार मारीत नाही. त्यानेही उपासमारीने मरावे. गोवधबंदी करून गायी-वासरांची अशा रीतीने उपासमार करण्यास कोणत्या धर्माची

अनुज्ञा आहे ? प्रत्यक्ष हत्या करण्याऐवजी गायी-वासरांची अशा रीतीने उपासमार करणे कोणत्या न्यायाने अधिक माणुसकीचे आणि आपल्या सांस्कृतिक परंपरेशी अधिक सुसंगत ठरते ? धर्मगुरूंनी आणि संतांनी या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे द्यावीत.

महत्त्वाची गोष्ट अशी की, सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने, विशेषेकरून ज्यांना गायी-गुरे प्रत्यक्ष सांभाळावयाची आहेत त्यांच्या दृष्टीने हा प्रश्न धर्माधिष्ठित नाही. प्रत्यक्ष व्यवहारात या प्रश्नाची आर्थिक बाजूच महत्त्वाची ठरते. तो भाकड, निरूपयोगी गायी-गुरांस चारा घालत नाही, वासरांस दूध पिऊ देत नाही. कारण, ते त्याला परवडत नाही. तो नको असलेली वासरे आणि निरूपयोगी गायी-गुरे उपाशी मरू देतो. कारण, शास्त्रशुद्ध हत्येचा मार्ग त्यास मोकळा नाही. हा मार्ग मोकळा नसल्यानेच तो दुसरा मार्ग अवलंबतो. गायी-गुरांची, वासरांची ही उपासमार आर्थिकदृष्ट्या किती विध्वंसक आहे याची आपणास आज पुरेशी जाणीव नाही. कारण, आपण दुसरा मार्गच मोकळा ठेवलेला नाही. शास्त्रशुद्ध हत्येचा मार्ग मोकळा असेल तर कोणीही कोणत्याही गायी-गुरांची उपासमार होऊ देणार नाही. कोणती गुरे ठेवावीत आणि कोणती गुरे काढावीत यांचा विचार करून नको असलेली गुरे तो काढून टाकील आणि बाकीच्या गुरांची नीट जोपासना करील, उपासमारीच्या उपायाने हे साधत नाही. अगदी नको असलेली गुरे काहीतरी खातातच आणि त्यामुळे आर्थिकदृष्ट्या उपयुक्त असलेल्या गुरांना पुरेसे खाऊ देत नाहीत. म्हणजे सर्वच गायी-गुरांना कमी-अधिक प्रमाणात उपासमारीची झळ सोसावी लागते. आणि त्यामुळे चांगल्या गुरांचीही कार्यक्षमता कमी होते. खेरीज या उपासमारीतून जी गुरे निभावतात ती नेहमी चांगली गुरेच असतात असे नाही. पुष्कळदा केवळ उपासमारीत टिकाव धरणे एवढाच त्यांचा गुण असतो. शास्त्रशुद्ध हत्या आणि उपासमार यांत महत्त्वाचा फरक म्हणजे जेव्हा एखादे उत्तम पोसलेले जनावर बुध्दया मारण्यात येते तेव्हा त्याला आर्थिकदृष्ट्या पुष्कळच मूल्य असते. उलट उपासमार झालेले जनावर स्वत;चे मांस स्वत;च खात असते आणि शेवटी जेव्हा ते मृत्युमुखी पडते तेव्हा हाडाचा सापळा आणि एक हलक्या दर्जाचे कातडे याखेरीज त्याचे काहीच उरलेले नसते. या सर्व कारणांनी शास्त्रशुद्ध हत्येचा मार्ग मोकळा असला तर कोणीही कोणत्याही गायी-गुरांची उपासमार होऊ देणार नाही. आज हा मार्ग सरसकट उपलब्ध नसल्यानेच देशात गायी-गुरे, वासरे यांची अनिवार उपासमार चालू आहे.

आज या साऱ्या प्रश्नांचा वस्तुनिष्ठ विचार करणे अशक्य झाले आहे. कारण या विषयांच्या चर्चेत आपण काही निरर्थक उपमा आणल्या आहेत. गायीस गोमाता म्हटले म्हणजे या प्रश्नाच्या आर्थिक बाजूंचा विचार करणे अशक्य होते. म्हणून या प्रश्नाचा सामान्य माणसाच्या दृष्टीने विचार करावयाचा असेल तर गायीस माता किंवा देवता

म्हणणे बंद केले पाहिजे. गायीस दिलेली आईची उपमा ही खोटी आणि अप्रामाणिक आहे हे आपणास सर्वांना माहिती आहे. गायीचे आणि आपले नाते हे आईचे व मुलाचे नाते नाही, हे आपण अंतर्यामी जाणून आहोत. ज्या कोणाला प्रत्यक्ष गायी-गुरे सांभाळावी लागतात त्याला हे कळते की त्याचे आणि गायीचे संबंध हे आर्थिक व्यवहारावर अवलंबून आहेत.

गाय आपणास दूध देते म्हणून आपण तिला गोमाता म्हणतो आणि चारा घालतो. तिने दूध देणे बंद केले म्हणजे तिला गोमाता म्हटले तरी आपण तिची उपासना करू, जोपासना करणार नाही, हे आपण मनोमन जाणून आहोत. तर मग केवळ तिला गोमाता म्हणून आपण निष्कारण आपणांस का अडचणीत टाकीत आहोत की ज्यामुळे तिची उपासमार करण्याखेरीज आपणासमोर गत्यंतरच नसावे ? या प्रश्नावर तोडगा एकच, तो म्हणजे गायीला गाय म्हणणे, गोमाता न म्हणणे. गायीला गाय म्हटले म्हणजे आपणांत आणि गायीत स्वाभाविक आणि निकोप नाते निर्माण होईल आणि या प्रश्नाचा वस्तुनिष्ठ विचार करणे शक्य होईल.

आपण आणि गाय यांमधील संबंध आर्थिक व्यवहारावर आणि प्राणीमात्रांत चालू असलेल्या जीवनसंघर्षावर अधिष्ठित आहे, हे प्रांजलपणे कबूल केले पाहिजे. आपण गोमातेची उपासना सोडून दिली तरी गोधनाची जोपासना करू. आज गाय केवळ दूध देते म्हणूनच आपण तिला चारा घालतो. ती मांसही देऊ शकते हे लक्षात घेतले म्हणजे तिला आपण अधिक चारा घालू शकू. या व्यवहारात काही गायींची हत्या होईल. परंतु सर्व गायींचे, त्या जिवंत आहेत तोपर्यंत, पोषण करणे आपणास शक्य होईल. कारण ते आपल्या आर्थिक फायद्याचे आहे. वासरे मोठी होतील तशी त्यातील काही निवडक ठेवून बाकीची आपण क्रमश; काढून टाकू. परंतु प्रत्येक वासरास अखेरच्या क्षणापर्यंत पोटभर खाण्यास देऊ या व्यवहारात काही गायी-गुरांची, वासरांची हत्या होईल. परंतु कोणीही उकिरडे आणि धुळीचे फुफाटे फुकंत वणवण हिंडणार नाही. कोणीही अन्नाविना व्याकूळ होऊन धुळीत मिळणार नाही. सर्वत्र गोजिरवाणी वासरे आणि पुष्ट गायी-गुरे दिसू लागतील.

गोधनाची शास्त्रशुद्ध जोपासना करावयाची तर ही मूलतत्वे मानली पाहिजेत. पोषण करा, निवडक ठेवा आणि इतर काढून टाका. कालवड व खोंड, गाय व बैल, एक गाय आणि दुसरी गाय, एक बैल आणि दुसरा बैल यांची सतत तुलना करून संख्येने अधिक होत असलेली गुरे, अर्थव्यवहारात न परवडणारी गुरे सतत निवडून काढून टाकली नाहीत तर कोणत्याच गायी-गुरांस पोटभर चारा घालणे अशक्य होते आणि सारीच गुरे निकृष्ट होतात. भारतातील गोधनाची आज ही स्थिती झाली आहे. या अवस्थेतून आपले गोधन जतन करावयाचे असेल, समृद्ध करावयाचे असेल तर गोधनाची शास्त्रशुद्ध जोपासना

हा एकमेव मार्ग आहे. या संबंधात भारतीय घटनेतील मार्गदर्शक तत्वांचा वारंवार उल्लेख करण्यात येतो. सर्व राज्यांनी गायी, वासरे आणि इतर दुभती जनावरे आणि शेती व पशुधन यांची शास्त्रशुद्ध तत्वानुसार जोपासना करण्याचा प्रयत्न करावा आणि गायी-वासरांच्या हत्येला बंदी घालावी. घटनेने मार्गदर्शक तत्वांत दिलेल्या या दोन आदेशांत [५] शास्त्रीयदृष्ट्या उघडउघड विरोध आहे. तरी या दोन आदेशापैकी कोणत्या आदेशाचा स्वीकार करावयाचा हे आपणच ठरविले पाहिजे. ते करावयाचे तर या प्रश्नाचा वस्तुनिष्ठ विचार होणे आवश्यक आहे.

## टीपा

[या संदर्भातील नवीन आकडेवारीकडे वाचकांचे लक्ष जावे यासाठी या टीपा जोडल्या आहेत. - संपादक ]


क्रमांक १ - आज देशाची लोकसंख्या १०१ कोटींवर (२००१) तर गुरांची संख्या सुमारे ४७ कोटींवर गेली आहे. त्यांत नुसत्या गायींची संख्या २० कोटींच्या घरात आहे. महाराष्ट्रात सुमारे २ कोटी गायी-बैल आहेत. (१९९२) अर्थात गेल्या काही वर्षात ही सर्वच संख्या आणखी वाढलेली असणार.

क्रमांक २ - उपलब्ध आकडेवारीप्रमाणे भारतातील मृत्यूचे प्रमाण दरहजारी ८.५ ते ९.०० इतके घसरले आहे.

क्रमांक ३ - २००१ च्या जनगणनेप्रमाणे हा दर मागील दशकासाठी १.९३ टक्के इतका होता.


क्रमांक ४ - अलीकडच्या उपलब्ध आकडेवारीनुसार १९८७ ते १९९२ या पाच वर्षात गायी-गुरांची संख्या ५.७ टक्क्यांनी वाढली.

क्रमांक ५ - घटनेच्या मार्गदर्शक तत्वांतील ४८ व्या कलमात म्हटले आहे, `शेती व पशुधन यांची आधुनिक व शास्त्रशुद्ध पद्धतीने जोपासना करण्याचा राज्यांनी प्रयत्न करावा, तसेच त्यांची पैदास, अधिक चांगल्या दर्जाची करण्याचा व गायी-वासरे व इतर दुभती व ओझ्याची जनावरे यांच्या हत्येला प्रतिबंध करावा.`




नकाशा १

जगाच्या नकाशात कोरियाचे स्थान कुठे आहे ते वरील नकाशात (नकाशा १ मध्ये ) दाखविण्यात आले आहे. पण नकाशा काढण्याच्या नवीन ग्न्नीप्रमाणे पृथ्वी सपाट समजून हा नकाशा काढण्यात आला आहे. त्यामुळे पश्चिमेकडील अमेरिका नकाशात पूर्वेच्या बाजूला दिसत आहे.




नकाशा २

उत्तर व दक्षिण कोरियाचा नकाशा सोबतच्या नकाशात (नकाशा २ मध्ये ) स्वतंत्रपणे देण्यात आला आहे.

(दोन्ही नकाशे अनुक्रमे इकॉनॉमिस्ट १७ मे व १९ एप्रिल २००३ या साप्ताहिकातून घेण्यात आले आहेत)

संदर्भ - कोरियातील अमेरिकाविरोध (पृष्ठ क्रमांक ११ ते १५ व १६ ते १९)

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळया विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

•विकासचंद्र चित्रे •मृणालदत्त चौधरी •कुमुदिनी दांडेकर
•द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •मनोहर भिडे •नीळकंठ रथ
•के. एन्. राज •व्ही.एम्.राव •ए. वैद्यनाथन
•सत्यरंजन साठे •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**